# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २० मार्च, २०१७ / फाल्गुन २९, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री**<br>**(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**<br>**(३) पर्यावरण मंत्री**<br>**(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९५**

---

**राज्यात डाळींच्या दरांवर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(१) * २९६१२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २३५४० ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (नवी मुंबई) येथील घाऊक अन्नधान्य बाजारात दररोज चार हजार क्विंटलच्या दरात तुरदाळीचे दर प्रतिकिलो रुपये ६० झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुगडाळ रुपये ६५ ते ८०, उडीद डाळ रुपये ८० ते १०० व चनाडाळ अजूनही रुपये १२० ते १३० किलोच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तुरडाळीचे दर नियंत्रणात ठेवण्यासोबतच मूगदाळ, उडीददाळ तसेच चनाडाळीचे दर सर्वसामान्यांना सोयीच्या दरात उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.
(२) कृषि उत्पन्न बाजार समिती वाशी यांच्या अहवालानुसार माहे डिसेंबर, २०१६ मध्ये महिना अखेरीस मुगडाळ प्रतिकिलो दर रुपये ५८ ते ६४, उडीदडाळ प्रति किलो दर रुपये ७६ ते ९४ व चनाडाळ प्रतिकिलो दर रुपये ११८ ते १२५ इतका होता.
(३) राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी, डाळींवरील दर नियंत्रक कायद्याचा मसुदा मंत्रीमंडळाच्या मान्येतनंतर केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे.

शासनाने दिनांक २८/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये अ.मु.स.(कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली दर नियंत्रण समिती गठीत करण्यात आली असून डाळींच्या दराबाबत वेळोवेळी बैठका घेऊन आढावा घेण्यात येत आहे.

राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टिकोनातून सर्व जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर त्यांच्या जिल्ह्यातील सर्व संबधित किरकोळ व घाऊक व्यापारी तसेच आयातदार यांच्या नियमितपणे बैठका घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत तसेच जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत साठा निर्बंधाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाच्या दिनांक १६/०४/२०१६ व दिनांक २०/०६/२०१६ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शारिरीक शिक्षकांना न्याय देण्याबाबत**

**(२) * २६७८६ प्रा.अनिल सोले, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शारिरीक शिक्षण या विषयाच्या शिक्षकांची नविन भरती रद्द करून सदरहू भरती मानधन तत्वावर करणार असल्याचा शासन निर्णय दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने घोषित केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बी.पीएड, एम.पीएड, बी.एड सारखे उच्च शिक्षित असणा-या युवकावर उपासमारीची वेळ आल्याने सदर शासन निर्णय अन्यायकारक असून उपरोक्त शासन निर्णय रद्द करण्याबाबत मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रिडा व मा.केंद्रीय मंत्री, मानव संसाधन विकास, भारत सरकार, नवी दिल्ली यांना लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शासन निर्णयात सुधारणा करुन शारिरीक शिक्षकांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) असे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शालेय शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याबाबत**

**(३) * २६७७५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मागील काही वर्षापासून शालेय शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पात कमी निधीची तरतूद करीत असल्याचे तसेच उक्त निधीपैकी ४० टक्के खाजगी शाळांवर खर्च केला असल्याचे चाइल्ड राईटस ॲण्ड यू (क्राय) आणि सेंटर फॉर बजेट, गव्हर्नन्स अँड अकांऊटिबिलिटी (सीबीजीए) या संस्थांनी काढलेल्या सर्वेक्षणात दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय माध्यमिक शाळांवर कमी निधी खर्च केला जात असल्याने माध्यमिक शाळांमधील शैक्षणिक अवस्था दयनिय झाली असून विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा सुरु करुन विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान कार्यक्रमामधून शासकीय शाळांना आवश्यक भौतिक सुविधांकरिता सहाय्य, शिक्षक प्रशिक्षण तसेच शासकीय व अनुदानित शाळांसाठी आयसीटी प्रयोगशाळा आदी सहाय्य दिले जाते. तसेच, शासन निर्णय दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ नुसार गुणवत्ता वाढीकरिता माध्यमिक शाळांसाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत

**(४) * ३०१९४ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना दिनांक १ जानेवारी, २००६ पासून रुपये ४३,००० ची सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत व त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अकृषि विद्यापीठे व संलग्नित उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील महाविद्यालयातील प्राचार्यांचे किमान वेतन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार रुपये ४३,०००/- करण्याबाबतच्या प्रस्तावावर वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्राचार्य पदांसाठी अनुभवाच्या अटींच्या मुद्यांवर विद्यापीठ अनुदान आयोगाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अद्याप अभिप्राय अप्राप्त आहेत.

दिनांक १२ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील आदिवासी, डोंगराळ व ग्रामिण भागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील अकृषि विद्यापीठे, संलग्नित शासकीय संस्था/महाविद्यालये, अशासकीय अनुदानित महाविद्यालये इत्यादी मधील प्राचार्यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६५ वर्षे सरसकट करण्यात आलेले आहे. उर्वरित क्षेत्रातील प्राचार्यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत ६० वरुन ६५ वर्षे करण्याबाबत दिनांक ०५ मार्च, २०११, दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ व दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ च्या शासन निर्णयातील तरतूदी कायम ठेवण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५) * २९३५४ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक १५३३१ ला दिनांक १५ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट नसलेल्या परंतु लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत पूर्वी लाभ घेत असलेल्या १७७.१९ लक्ष लाभार्थ्यांना राज्यातील शिधापत्रिकांच्या आधार सिडींगचे काम पूर्ण झाल्यानंतर अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस लाभार्थी वगळून पात्र व योग्य लाभार्थ्यांनाच उक्त योजनेद्वारे स्वस्त दरात धान्य पुरवठा उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेंतर्गत राज्यातील शिधापत्रिकाच्या आधार सिडींगचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पांतर्गत दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक व बँक खाते क्रमांक PDS Database मध्ये संकलित करण्यात येत आहेत. लाभार्थ्यांच्या आधार क्रमांक नोंदणीकरिता क्षेत्रियस्तरावर कॅम्पचे आयोजन करण्यात आले. तसेच शासन स्तरावरुनही इतर आवश्यक सर्व प्रयत्न करण्यात येत आहेत. सद्यस्थितीत, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम अंतर्गत राज्यातील ७ कोटी १६ हजार लाभार्थ्यांपैकी ६.१० कोटी लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण झाले असून उर्वरित आधार सिडींगबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिरसाळा (जि.बीड) येथील वक्फ मालमत्तेवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(६) * २९३७८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरसाळा (जि.बीड) येथील सर्व्हे क्र.२२६ व १८२.२७ गुंठे वक्फ मालमत्तेवर झालेले अतिक्रमण व करारनामे यावर फौजदारी कारवाई करण्याबाबत जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान नोटीस काढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील वक्फ मालमत्तेची होत असलेली विक्री, अतिक्रमण व करारनामे रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे. दर्गा हजरत शख फरीदोदीन तवकली कब्रस्तान व मस्जीद, या वक्फ संस्थेची मौजे सिरसाळा, ता.परळी, जि.बीड येथे २५२ एकर जमीन ही वक्फ मालमत्ता आहे. यापैकी जुने सर्व्हे क्र.१३४ व १३५ व आताचे गट क्र.१९२ पैकी ७ आर, गट क्र.१९३ पैकी ९६ आर, गट क्र.१९७ पैकी २ हेक्टर ९८ आर, गट क्र.२०० पैकी १ हेक्टर १५ आर, गट क्र.२०२ पैकी ९५ आर, गट क्र.२०३ मध्ये १ हेक्टर ८१ आर या वक्फ जमिनींच्या ७/१२ उताऱ्यामध्ये अनधिकृतपणे काही खाजगी इसमांची नावे नोंदविण्यात आली असून सदर वक्फ जमिनीचे बेकायदेशीर खरेदी विक्री करण्यात आल्या विषयी प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरुन जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी त्यांच्या दिनांक २२/९/२०१५ च्या पत्रान्वये वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ नुसार कार्यवाही सुरु करण्याविषयीची नोटीस संबंधितावर बजावली आहे.

(२) सदर वक्फ मालमत्तेच्या ७/१२ उताऱ्यावर तहसिलदार परळी (वै) यांनी फेरफार क्र.३४७५ अन्वये "प्रतिबंधित सत्ता प्रकार" अशी नोंद घेतलेली आहे. सद्य:स्थितीत ७/१२ उताऱ्यावर नोंदविण्यात आलेल्या अनधिकृत इसमांची नावे कमी करण्याविषयीची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, परळी (वै) यांच्यास्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुलाबा किल्ल्याची (ता.अलिबाग, जि.रायगड) दुरवस्था झाल्याबाबत

**(७) * २८१००  श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा किल्ल्याची (ता.अलिबाग, जि.रायगड) दुरवस्था झाली असून किल्ल्याच्या पडलेल्या तटबंद्यांच्या दुरुस्तीची सुरु असलेली कामे अर्वधट अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुलाबा किल्ला पाहण्यासाठी देश-विदेशी पर्यटक भेटी देत असून त्यांना मुलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याने सदर किल्ल्याच्या दुरूस्तीसाठी व पर्यटकांच्या मुलभूत सुविधेसाठी शासनाकडून आवश्यक असलेल्या निधीची उपलब्धता करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधी कधीपर्यंत मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

हा किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडलाच्या अधिपत्याखाली आहे. याबाबत अधिक्षक, पुरातत्वविद् भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मंडळ कार्यालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त माहिती नुसार या किल्ल्याच्या जतन-दुरुस्तीचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण केले असून त्या अंतर्गत पायवाटा, सुलभ शौचालये तसेच दिशादर्शक फलक या मूलभूत सुविधा देण्यात आल्या आहेत. दुसऱ्या टप्प्यातील काम पुढील आर्थिक वर्षी सुरु करण्यात येणार असून उर्वरित मुलभूत सुविधा निर्माण करण्याचे काम या टप्प्यात करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस कार्डाची योजना लागू करण्याबाबत**

**(८) * २८४८० श्री.कपिल पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक २१७६१ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजने प्रमाणे राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैदयकीय खर्चाची देयके मंजूर करण्याच्या प्रक्रियेऐवजी कॅशलेस कार्डाची सावित्रीबाई फुले - फातिमा शेख आरोग्य कुटुंब योजना लागू करण्याबाबतचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना लागू करण्यासंदर्भात हिवाळी अधिवेशन, २०१४ मध्ये घोषणा करण्यात येवूनही अद्याप कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**मुंबई व ठाणे येथील महाविद्यालयातील प्राचार्यांची बेकायदेशीररित्या नियुक्ती केल्याबाबत**

**(९) * २८०३२ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाणे येथील १८ महाविद्यालयातील प्राचार्यांची नियुक्ती करतांना नियमांचे पालन झाले आहे की नाही याची चौकशी करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच मुंबई विद्यापीठाला दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालय व प्राचार्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार चौकशीअंती किती व कोणत्या महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियुक्त्या बेकायदेशीररित्या करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अन्यायग्रस्त उमेदवारांना प्राचार्य पदी नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०५/०१/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मुप्टा संघटनेने शासनास दिनांक १८/०१/२०१७ रोजी त्यांचे निवेदन सादर केले. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश व याचिकाकर्त्यांचे निवेदन विचारात घेऊन प्रकरणाची प्रकरणनिहाय सखोल तपासणी करुन त्याबाबतच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांना

देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करुन महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियुक्त्याबाबत शासनस्तरावर उचित निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठातील परिक्षांमधील गैरप्रकार रोखण्याबाबत**

**(१०) * २८१८२ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा सुरू असताना वर्ग खोल्यामध्ये कॉपी मटेरिअल सापडणे, केंद्र प्रमुख गैरहजर, उत्तरपत्रिकेवर केंद्राचा शिक्का व पर्यवेक्षकाची सही नसणे, ओळखपत्रावर संबंधित महाविद्यालयाच्या नावाचा शिक्का, प्राचार्याची सही नसणे, बैठक क्रमांकाची नोंद नसणे, आदी गैरप्रकार होत असल्याचे भरारी पथकाद्वारे दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षा नियंत्रकाचे तसेच प्र-कुलगुरूचे पद रिक्त असल्याने, परिक्षा वेळेत होत नसून निकाल जाहिर होण्यास विलंब होत असल्याने हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विद्यापीठातील गैरप्रकार टाळण्यासाठी, कॉपी करण्यास प्रतिबंधक करण्यासाठी विद्यापीठाच्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) परिक्षांचे निकाल वेळेवर जाहीर करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली असून संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी येथील पुरवठा विभागाच्या गोदामातून धान्याचा अपहार झाल्याबाबत**

**(११) * २९४१२ श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक २५४९४ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील पुरवठा विभागाच्या गोदामातून रेशन दुकानासाठी वाटप केलेल्या धान्यामध्ये झालेल्या ४ कोटी ९७ लाख रुपयांच्या अपहाराप्रकरणी शासनाने केलेली चौकशी पूर्ण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीचे स्वरुप काय आहे तसेच चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या पथकाने केलेल्या गोदाम तपासणी अहवालानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरीत करावयाच्या अंदाजे ४ कोटी ९७ लाख ६९ हजार ९२९ रुपये एवढया किंमतीच्या अन्नधान्याचा परभणी येथील शासकीय गोदामातून अपहार झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे.

सदर प्रकरणात दिनांक १३/८/२०१६ रोजी गु.र.नं. ३०५/१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण १६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी श्री.अनिल आंबेराव, गोदामपाल परभणी, श्री.सि.बी. पांचाळ, नायब तहसिलदार (पुरवठा) परभणी, श्री.संतोष रुईकर, तहसिलदार, परभणी, श्री.दिलीप कच्छवे, जिल्हा पुरवठा अधिकारी, परभणी यांना निलंबित करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील हृदय विकाराच्या रुग्णांना जीवनदान देणारे स्टेंट जादा किंमतीत विकत असल्याबाबत**

**(१२) * २९०७४ श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील हृदय विकाराच्या रुग्णांना जीवनदान देणारे स्टेंट जादा किंमतीमध्ये विकण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हृदयावरील प्रक्रियेकरिता स्टेंटचा वापर महत्वाचा असल्याने स्टेंटची मुळ किंमत कमी असतांना ती रुग्णालयात येईपर्यंत जादा किंमतीमध्ये विकली जात असल्याने रुग्णांची आर्थिक फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने रुग्णांना वाजवी दरात स्टेंट उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७ च्या आदेशान्वये कार्डियाक स्टेंटच्या किंमतीवर नियंत्रण आणले आहे. दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७ नंतर नमुद किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारण्यात येत असल्याच्या ०३ तक्रारी अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झाल्या होत्या. तपासाअंती त्या तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १०० शाळांना आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याबाबत

**(१३) * २८६४६ श्री.प्रकाश गजभिये, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २४५३० ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १०० शाळा पुढील दोन वर्षात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या करण्यासंदर्भात शासनाकडून प्रयत्न सुरु असून त्यासाठी केंब्रिज विद्यापीठासोबत कृती आराखडा करण्याची सुरु करण्यात आलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तयार केलेल्या कृती आराखडयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार राज्यभरातील कोणत्या शाळांचा समावेश करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांचा विकास होण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उल्हास नदी प्रदुषण मुक्त करण्याबाबत**

**(१४) * २९०७७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २०९२४ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथून वाहणारी उल्हास नदी मोठया प्रमाणात प्रदुषित झाली असून सदर परिसरात दुर्गंधी पसरली आहे तसेच उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कंपन्या रासायनिक सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया न करता प्रदूषित पाणी ठाणे जिल्हयातील उल्हास नदीत सोडत असल्याचे वनशक्ती पर्यावरण संस्थेच्या माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांडपाणी सोडताना कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न केल्याने उल्हास नदी प्रदूषित झाल्याने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका आणि कुळगाव-बदलापूर नगरपालिका यासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना दोषी ठरवून हरित लवादाने १०० कोटी रुपयांचा दंड जाहिर केला असून राज्याच्या मुख्य सचिवांनी यासंदर्भात लवादासमोर प्रतिज्ञापत्र सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात वस्तुस्थिती काय आहे व संबंधितांनी दंडात्मक कारवाईला सामोरे जावून उपाययोजना करण्यापूर्वी मुख्य सचिवांनी प्रतिज्ञापत्र देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्जत तसेच उल्हासनगर येथून वाहणाऱ्या उल्हास नदीचे होत असलेले प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) नागरी सांडपाण्यामुळे उल्हास नदीचे प्रदूषण होत आहे ही वस्तूस्थिती आहे.

(२) व (३) अ) मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी दिनांक २/७/१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार पाच औद्योगिक सामायिक सांडपाणी प्रक्रिया संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था (उल्हासनगर महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कुळगांव-बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका) यांना रुपये १०० कोटी रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले होते.

ब) तथापि, मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १९/८/२०१५ व तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ३०/०६/२०१६ रोजीच्या निर्णयानुसार रुपये १०० कोटी निधी जमा करण्यास स्थगिती दिली आहे. तसेच मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी दिनांक १४/९/२०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने या नदी काठावरील महानगरपालिका, नगरपालिका मधून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरवून त्याची सद्य:स्थिती दर्शक अहवाल शपथपत्राद्वारे मा.मुख्य सचिव यांनी सादर केले.

(४) उल्हास नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत खालील कार्यवाही करण्यात आली.

- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, संबंधित स्वराज्य संस्था, सामुयिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सीईटिपी) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यामार्फत कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात आलेला असून त्याची अमलबजावणी होत आहे.
- उपरोक्त उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.
- सदर समितीच्या कामाकाजाचा आढावा मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत उच्चस्तरीय समितीकडून वेळोवेळी घेण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(१५) * २६७६४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २३७४६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लिम समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत सुधारणा व्हावी यासाठी मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असलेल्या बाबीवर निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे, तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, तसेच त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) तसेच न्यायमुर्ती सच्चर, रंगनाथ मिश्रा आयोग, डॉ.महेमुदूर रहेमान आयोग यांनी मुस्लिम समाजातील आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेपणाची दखल घेऊन मुस्लिम समाजास आरक्षण व इतर सोयी सुविधा देण्याबाबतच्या शिफारशी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लिम समाजास वरील तिन्हीही क्षेत्रात वटहुकूम काढून आरक्षण व इतर सोयी सुविधा देण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजातील एकूण ५० मागास घटकांना नोकरीमध्ये व शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्यात आले होते.

याबाबत मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी अंतरिम निर्णय दिला आहे व सदर अंतरिम आदेशाव्दारे शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. परंतु खाजगी विना अनुदानित संस्थांमधील प्रवेश व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेल्या आरक्षणाला स्थगिती दिली आहे.

परंतु सदर अध्यादेशाचे दिनांक २३ डिसेंबर, २०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने सदर अध्यादेश व्यपगत झाला आहे.

(३) होय.

(४) मुस्लिम समाजासाठी आरक्षणाची बाब मा.उच्च न्यायालयात अंतिम निर्णयासाठी प्रलंबित आहे. याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई (जि.पालघर) पंचायत समितीत पाणी पुरवठयात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१६) * २९९०४ श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील कसराळी, फणसपाडा व तलावपांडा या गावांमधील पाणी टंचाई दूर करण्यासाठी सन २००७-०८ मध्ये पंचायत समितीने टँकरने केलेल्या पाणीपुरवठयामध्ये तत्कालीन गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील लिपिक यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे पंचायत समितीच्या लेखापरीक्षण अहवालातून माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वसईतील गिरीज टोकीपाडा येथे जिल्हाधिका-यांचे आदेश नसतानाही टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन टँकर पाणीपुरवठा गैरव्यवहाराची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

स्थानिक निधी लेखा विभागाच्या सन २००७-०८ लेखा परीक्षण अहवालामध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याच्या कामाबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांचे आदेश क्र.पाजिप/पापुवि/आस्था-१/वशी०९/२०१७, दिनांक १६/०१/२०१७ अन्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व गुणवत्ता) जिल्हा परिषद, पालघर यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली असून चौकशी अहवाल अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंहगड व राजगड (जि.पुणे) किल्ल्यांच्या संवर्धन कामात कंत्राटदारांकडून अनियमितता झाल्याबाबत

**(१७) * २८२३८ श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंहगड व राजगड (जि.पुणे) किल्ल्यांच्या संवर्धन कामात कंत्राटदाराकडून अनियमितता झाल्याने कामे थांबविण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर किल्ल्यांवर सदोष कामे केलेल्या कंत्राटदाराकडून दंड वसूल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

सिंहगड किल्ला या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन-दुरुस्ती कामात अनियमितता असल्याची तक्रार मा.आमदार भीमराव तापकीर यांनी मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे केल्यानंतर मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत इंजिनिअरींग कॉलेज, पुणे येथील तज्ञांची एकसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. सदर समिती तज्ञांने प्रत्यक्ष पाहणीनंतर सिंहगड किल्ल्याच्या जतन-दुरुस्ती कामात अनियमितता आढळून आल्याचा अहवाल मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर केल्यानंतर सदर काम थांबविण्यात आले.
(२) विभागाने कंत्राटदारास काळया यादीत टाकले असून सिंहगड किल्ला, जि.पुणे या राज्य संरक्षित स्मारकावरील आजपर्यंत झालेल्या कामाचे पूर्ण देयक संबंधित कंत्राटदारास अदा करण्यात आले नसल्याने दंड वसूल करण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानात तांदळाचा काळाबाजार होत असल्याबाबत**

**(१८) * २९१६१ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानातून अन्नसुरक्षा, अंत्योदय योजना व शेतक-यांसाठी दरमहा वितरीत होणा-या पाच टन तांदळाचा काळाबाजार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वस्त धान्य दुकानात होणा-या काळाबाजाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार काळाबाजार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, दिनांक २०/१/२०१७ रोजीच्या दैनिक लोकमत व दैनिक भास्कर या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद व नायब तहसिलदार (पुरवठा), वैजापुर यांनी चौकशी केली असता अन्नधान्याचा अपहार झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील स्वस्त धान्य दुकाने बायोमेट्रिक करण्याबाबत**

**(१९) * २७४८३ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक २३१६३ ला दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५१ हजार स्वस्त धान्य दुकाने बायोमेट्रिक करण्यासाठी धान्य दुकानांत पॉईट ऑफ सेल अर्थात पॉश मशिन प्रणाली बसविण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय. लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूंचे वितरण करण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. तद्नुषंगाने, माहे मार्च, २०१७ मध्ये राज्यातील ९ जिल्ह्यांतील १०६९३ रास्तभाव दुकानांमध्ये POS मशीन बसविण्यात येत असून उर्वरित कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई, ठाणे, नाशिक, बुलढाणा येथे बनावट सौंदर्य प्रसाधने व औषधांचा साठा जप्त केल्याबाबत

**(२०) * २९८८१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह ठाणे, नाशिक, बुलढाणा येथे सापडलेल्या बनावट सौंदर्य प्रसाधने आणि बनावट औषध साठयावर अन्न व औषध प्रशासन विभागाने (एफडीए) कारवाई केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारवाईत किती किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनावट सौंदर्य प्रसाधने व औषध उत्पादकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी मुंबई, ठाणे, नाशिक, बुलढाणा या ठिकाणी धाडी टाकून सुमारे रुपये २ कोटी, ६० लाख किंमतीचा बनावट सौंदर्य प्रसाधनांचा तर अंदाजे रुपये २३ हजार किंमतीचा बनावट औषधाचा साठा जप्त केला आहे. त्याचबरोबर ठाणे येथे औषधे व जादूटोणादी उपाय (आक्षेपार्ह जाहिराती) कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन केल्याने दोन वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून अंदाजे रुपये १० लाख किंमतीचा आयुर्वेदीक औषधांचा साठा जप्त केला आहे.

(३) मुंबई येथील धाडीप्रकरणी कंपनीच्यावतीने कॉपीराईट ॲक्ट, १९६७ मधील कलम ५१ व ६३ च्या उल्लंघनाबाबत पायधुनी पोलीस स्टेशन, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल क्र. ०४/२०१७, दिनांक १७/०१/२०१७ रोजी नोंदविलेला आहे. प्रशासनाच्या दिनांक १८/०१/२०१७ च्या पत्रान्वये सदरच्या आरोपींनी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील कलमांचे उल्लंघन केल्याने या कायद्यातील तरतुदींचाही समावेश त्यांच्याविरूध्द पायधुनी पोलीस स्टेशन, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या प्रथम खबर अहवाल क्र.०४/२०१७ यात करावा अशी विनंती करण्यात आली आहे.

नाशिक येथील धाडीप्रकरणी बनावटी औषधांच्या संदर्भात मालेगाव पोलीस स्टेशन येथे प्रथम खबर अहवाल क्र.००९८ दिनांक १४/१०/२०१६ रोजी नोंदविण्यात आला आहे.

इतर दोन ठिकाणच्या प्रकरणी तपास सुरू असून, तपास पूर्ण होताच नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठात बोगस पदव्यांचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(२१) * २९८२७ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील बोगस पदव्यांचा गैरव्यवहार बंद करण्यासाठी पदवी प्रमाणपत्रांवर "क्युआर" कोडचा वापर करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई विद्यापीठातून गेल्या वर्षभरात सुमारे ९०० बोगस पदव्यांचे अनधिकृतपणे वाटप झाल्याची प्रकरणे निदर्शनास आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस पदविका धारकांवर कारवाई करुन पदवी प्रमाणपत्रावर "क्युआर" कोडचा वापर करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जानेवारी, २०१७ मध्ये पार पडलेल्या दीक्षांत समारंभात साधारणत: १,७५,००० प्रमाणपत्रांवर “क्युआर” कोडचा वापर करुन विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अकृषी विद्यापीठांनी स्नातक व स्नातकोत्तर अभ्यासक्रमाकरिता सत्र पध्दतीत बदल करण्याबाबत**

**(२२) * २७२४४ श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषी विद्यापीठांनी स्नातक व स्नातकोत्तर अभ्यासक्रमाकरिता सत्र पध्दती (semester pattern) सुरु केली असून सत्र पध्दती अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी, महाविद्यालये व विद्यापीठांवर परीक्षेचा भार वाढणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सत्र परीक्षा पध्दतीमुळे प्राध्यापकांना अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक असून काही महाविद्यालयांमध्ये मंजूर प्राध्यापकांची पदे रिक्त असून, या पदांवर अंशकालीन शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवीत असून अंशकालीन शिक्षकांना अभ्यासक्रम निश्चित वेळेत पूर्ण करण्याचे कोणतेही बंधन नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सत्र परीक्षा पध्दतीत बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शैक्षणिक वर्ष २०१७ मध्ये इयत्ता सातवी व नववीचा अभ्यासक्रम बदलण्याच्या निर्णयाबाबत**

**(२३) * २७७५५ श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक वर्ष २०१७ मध्ये इयत्ता सातवी व नववीचा अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार विद्यार्थ्यांना पुस्तके वेळेत मिळावीत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) जून, २०१६ मध्ये इयत्ता सहावीची पुस्तके बदलण्यात आली व जून, २०१७ मध्ये त्याच मालिकेत इयत्ता सातवीची पुस्तके बदलण्यात येत आहेत. दरम्यानच्या काळात इयत्ता सहावी ते दहावी या स्तरावर अभ्यासक्रमात सुसूत्रता असावी यादृष्टीने वर्ष २०१७ मध्ये इयत्ता सातवी व नववीचा अभ्यासक्रम बदलण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) व (३) इयत्ता सातवी व नववीच्या पाठ्यपुस्तकांच्या पुनर्रचनेचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे. बालभारती येथे एकूण आठ भाषा माध्यमांच्या इयत्ता सातवी व नववीच्या पाठ्यपुस्तकांचे काम प्राधान्याने हाती घेण्यात आले असून, सदर पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच उपलब्ध व्हावीत यासाठी संपूर्ण नियोजन करण्यात आले आहे.

-----------------

**राज्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२४) * २६८०६ डॉ.अपूर्व हिरे, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या विनाअनुदानित शाळा, वर्गतुकडया तसेच अनुदानित शाळा व वर्ग तुकडयावरील कार्यरत शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे शासनाने कार्यवाही करण्याबाबत तसेच दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजीचा संच मान्यतेसंबंधीचा शासन निर्णय रद्द करावा या प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांविषयी सहानुभूतीपुर्वक व सत्वरतेने निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन शासनाने दिल्याने दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१७ रोजीचे आंदोलनही स्थगित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातही सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून लागू करा, नविन अंशदायी निवृत्तीवेतन योजना रद्द करा, महिलांना दोन वर्षाची बाल संगोपन रजा मंजुर करावी, निवृत्तीचे वय ६० करावे, शिक्षक-शिक्षकेतरांची रिक्त पदे तात्काळ भरावीत, दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजीचा संच मान्यतेसंबंधीचा निर्णय रद्द करावा, अतिरिक्त शिक्षकांचे वेतन समायोजन होईपर्यंत सुरु ठेवावे, इ. मागण्या शिक्षक संघटनांकडून सातत्याने करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) शिक्षण संचालनालय तसेच शासन स्तरावर संघटनांचे पदाधिकारी यांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या आहेत. प्रस्तुत मागण्यापैकी काही मागण्या धोरणात्मक असल्याने त्यासंदर्भात शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यातील शिक्षक व शिक्षकेतरांच्या थकित वेतनाबाबत**

**(२५) * २७१०५ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राच्या जाहिराती करणा-या शासनाकडे ठाणे, मुंबईसह राज्यातील शिक्षक व शिक्षकेतरांचे विविध प्रलंबित प्रकरणांतील सुमारे ३४ कोटी रुपये थकित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शिक्षण सचिवांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला असून शिक्षण विभागाने याची दखल घेऊन शिक्षकांची राहिलेली थकबाकी देण्यासाठी शासन निर्णय जाहिर केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन शिक्षकांचे व शिक्षकेतरांचे थकीत रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) ठाणे, मुंबईसह पूर्ण राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एकूण ३१.४९ कोटी रुपये एवढी रक्कम थकीत आहे.

(२) यासंदर्भात लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली होती. तथापि, दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास कोणताही शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नाही.

(३) शासनाच्या दिनांक २४ जुन, २०१५ च्या शासन निर्णयान्वये वेतन अनुदानाच्या थकबाकीसंदर्भात गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाने इस्त्रायलच्या चार विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार केल्याबाबत

**(२६) * २७२२७ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने इस्त्रायलचे चार विद्यापीठ तसेच बेन गुरियन विद्यापीठ यांच्यासोबत दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास सामंजस्य करार केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सामंजस्य करारांचे स्वरुप काय आहे व त्याचा लाभ मुंबई विद्यापीठ व विद्यार्थ्यांना कशाप्रकारे होणार आहे,

(३) असल्यास, उक्त करारांची अंमलबजावणी केव्हापासून होणे अपेक्षित आहे व सदर करारात किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई व इस्त्रायल या विद्यापीठांच्या करारान्वये या विद्यापीठांमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांना लेक्चर, सेमिनार यांना हजेरी लावण्याबरोबरच संशोधन सहकार्याचीही संधी मिळणार आहे. सदर करारान्वये मुंबई व इस्त्रायलच्या विद्यापीठातील विद्यार्थी संयुक्तपणे पी. एच. डी. पदवी प्राप्त करु शकतील. या करारात संशोधन साहित्याचा विनिमय करण्याच्या तरतुदींचा समावेश आहे तसेच विद्यार्थी हित आणि शैक्षणिक गुणवत्ता टिकवून अधिकाधिक संशोधनावर भर देऊन विद्यापीठ मार्गक्रमण करणार आहे.

(३) सदर करारांची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. या करारान्वये वेळोवेळी व आवश्यकतेनुसार निधीची तरतूद केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील खाजगी शाळा व महाविद्यालयांकडून नियमबाह्य शुल्क आकारुन विद्यार्थ्यांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(२७) * २७६०४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खाजगी शाळा व महाविद्यालयांकडून स्वच्छता देखभाल खर्च, जिमखाना, लायब्ररी शुल्क इत्यादी खर्च दाखवून नियमबाह्य शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी व पालकांच्या आर्थिक फसवणूकीला प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने 'फी इंडिया' (फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन) हे ॲप सुरु करण्यात आले असून ॲपवर महाविद्यालयाची स्वच्छता, देखभाल खर्च, जिमखाना, ग्रंथालय शुल्क, ओळखपत्र वाटपावेळी व बारावी परिक्षेचे ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना होत असलेला आर्थिक ताण तसेच काही शाळा एनजीओला मदत म्हणून विद्यार्थ्यांकडून पैसे घेत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त खाजगी शाळा व महाविद्यालयांकडून शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी ॲपवर आलेल्या तक्रारी फोरमच्यावतीने शिक्षण उपसंचालकांकडे मांडण्यात आल्या असून नियमबाह्य शुल्क आकारून विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या खाजगी शाळा व महाविद्यालयांवर नियंत्रण ठेवण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) नियमबाह्य शुल्काच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मधील तरतूदीनुसार विभागीय शुल्क नियामक समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीसमोर प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्याची कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे येथील इंद्रायणी नदीतील प्रदूषण रोखण्याबाबत**

**(२८) * २६९२९ श्री.अनिल भोसले, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ६९३४ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभाडे (ता.तळेगांव, जि.पुणे) येथील आंबी वराळे गावाच्या हद्दीतील औद्योगिक क्षेत्रातील कारखान्याचे रासायनिक पाणी तसेच ग्रामपंचायतीचे दूषित सांडपाणी इंद्रायणी नदीत सोडल्यामुळे नदीतील पाण्यास दुर्गंधी येऊन नदीचे पाणी जलचर प्राणी व मानवी आरोग्यास धोकादायक झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इंद्रायणी नदीच्या पाण्यात रासायनिक पाणी व सांडपाणी सोडणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) मौजे आंबी वराळे, ता.मावळ या गावाच्या हद्दीमधून परिसरातील औद्योगिक सांडपाणी तसेच गावाचे घरगुती सांडपाणी इंद्रायणी नदी पात्रात सोडले जात नाही.

सदर क्षेत्रात दोन उद्योगांमधून सुमारे ०.५ दशलक्ष लिटर औद्योगिक सांडपाण्याची निर्मिती होते. त्यापैकी एका उद्योगाने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया उभारली असून प्रक्रिया केलेले सांडपाणी उद्योग आवारातील बागबगीच्यासाठी वापरण्यात येते. तसेच, दुसऱ्या प्रकल्पाचे सांडपाणी सदरील औद्योगिक क्षेत्रामधील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात पुढील पुनर्प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी पाठविण्यात येते.

ग्रामपंचायतीमधुन तयार होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी यंत्रणा उभारणेबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने ग्रामपंचायतीस पत्र दिले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आयसीटी शिक्षकांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(२९) * २९२७६ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.परिणय फुके, श्री.कपिल पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी आयसीटी शिक्षकांअभावी संगणक शिक्षणापासून वंचित असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासन पुरस्कृत आयसीटी योजना शासनाने सन २००८-२००९ या सालापासून अनुदानित सुरू केली असून एन.आय.टी., आय.एल.एफ.एस., कोअर एज्युकेशन बिर्ला, शुक्ला या खाजगी कंपन्याच्या माध्यमातून राज्यांमध्ये ८ हजार संगणक कक्ष तयार करण्यात आले असून या योजनेस एका कक्षासाठी १२.५ लाख खर्च शासनाने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेअंतर्गत बी.ओ.टी. तत्वावर कंपन्याच्यावतीने कायम सेवेत सामावून घेण्यासाठी कार्यरत संगणक शिक्षकांनी महाराष्ट्र राज्य श्रमिक महासंघाच्यावतीने दिनांक १०/१२/२०१४, दिनांक ०८/०६/२०१५, दिनांक १२ व १३/१०/२०१५ रोजी नागपूर व मुंबई येथे आंदोलने केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कंत्राटी संगणक शिक्षकांचा ५ वर्षाचा करार संपल्याने शासनाने माध्यमिक शाळांमधील लाखो रुपये खर्च करुन तयार केलेली आयसीटी लॅब विनावापर असल्याने शाळा व १६ लाख विद्यार्थी संगणक शिक्षणापासून वंचित झाले असून आयटीसी शिक्षक बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार शिक्षकांना नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) आयसीटी ही केंद्र पुरस्कृत योजना असून राज्यात Built, Own, Operate and Transfer (BOOT MODEL) तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी निविदेद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या ऑपरेटर्सद्वारे राबविण्यात येते. निविदेनुसार निवडण्यात आलेल्या ऑपरेटर्स यांच्यासमवेत झालेल्या करारनाम्यातील कलम ८.५ नुसार ऑपरेटरद्वारा नियुक्त करण्यात आलेल्या संगणक निदेशकांना शासन सेवेत सामावून घेण्याचा तसेच कायम सेवेचे फायदे घेण्याचा कोणताही अधिकार असणार नाही. संगणक निदेशक हे ऑपरेटर्स यांच्यातर्फे नियुक्त कर्मचारी आहेत.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये विविध स्पर्धा आणि टॅलेंट सर्चच्या नावाखाली शुल्क घेऊन स्पर्धा परीक्षा घेतल्याबाबत

**(३०) * २९६०८ श्रीमती स्मिता वाघ, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यभरातील शाळांमध्ये विविध स्पर्धा आणि टॅलेंट सर्चच्या नावाखाली भरमसाठ शुल्क आकारून खाजगी संस्थामार्फत स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात, परंतु शासनाने पुरस्कृत केलेल्या स्पर्धा परीक्षांव्यतिरिक्त कोणत्याही स्पर्धा परीक्षांची सक्ती न करण्याची सूचना शाळांना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आतापर्यंत किती शाळांवर कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर निर्बंध आणण्याबाबत**

**(३१) * २८४२६ श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १५८८३ ला दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्याचे उत्पादन करणा-या कारखान्यांविरुध्द कडक कारवाई करण्याचे निर्देश मा. पर्यावरण मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्लास्टिकच्या वापरामुळे आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने प्लास्टिकच्या पिशव्यांवर निर्बंध आणून जनजागृती मोहीम राबविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत राज्यातील प्रत्येक प्रादेशिक कार्यालय स्तरावर प्लास्टीक कॅरी बॅग उत्पादन करणा-या कारखान्यांची तपासणी करण्याकरीता स्वतंत्र पथके तयार केली असून तपासणीमध्ये दोषी आढळणा-या कारखान्यांवर कारवाई करण्यात येते. तपासणीमध्ये आतापर्यंत ३० कारखान्यांचे उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले असून ४ उद्योगांवर पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

प्लास्टीक पिशव्यांच्या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कमी पटसंख्येची अभियांत्रिकी महाविद्यालये बंद करण्याबाबत**

**(३२) * २७१०७ श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३६७ अभियांत्रिकी आणि ३८८ व्यवस्थापन विषयक अभ्यासक्रम शिकविणाऱ्या विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये ३० टक्के पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या महाविद्यालयांना बंद करण्याची प्रक्रिया अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वैद्यकीय औषध निर्माण व्यवस्थापन, शिक्षण शास्त्र इत्यादी शाखांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या गेल्या ५ वर्षापासून कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय न करता निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

तथापि, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये ज्या अभ्यासक्रमात गत ५ वर्षात ३० टक्क्यापेक्षा कमी प्रवेश झाले असल्यास सदर अभ्यासक्रम बंद करण्याची तरतूद अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने माहे जानेवारी, २०१७ मध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्ड बुकमध्ये करण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे

(३) व (४) अभियांत्रिकी व तत्सम व्यावसायिक संस्था/अभ्यासक्रम सुरु ठेवणे/बंद करणे याबाबतची कार्यवाही ही अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अधिकार कक्षेतील बाब आहे.

-----------------

**राज्यातील शाळांना पायाभूत सुविधा व शिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३३) * २८२७६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.नारायण राणे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक आणि शैक्षणिक साहित्यापेक्षा पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी आणि देखभालीसाठी सर्वाधिक खर्च होत असतांनाही राज्यातील सहा जिल्हयात बालहक्क अभियान व क्राय या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या १२७ शाळांच्या सर्वेक्षणात ६४ शाळांमध्ये १ ली ते ४ थी साठी दोन वर्ग खोल्या, १८ शाळांमध्ये ५ खोल्या, ९४ टक्केपैकी ४ शाळांमध्ये ग्रंथालय नसणे, ६ जिल्ह्यात १५० मंजूर पदांपैकी फक्त १०१ शिक्षकांची पदे भरण्यात आली असणे, २८ टक्के शाळात पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, ९० टक्के शाळांमध्ये शौचालयांसाठी पाण्याची सोय नसणे, २९ टक्के शाळांना कोणत्याही प्रकारचे कुंपन नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान “असर” संस्थेच्या पाहणीतून निर्देशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार या सर्वेक्षणातील शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

क्राय या स्वयंसेवी संस्थेने राज्यातील शाळांचे सर्वेक्षण केले आहे. तसेच असरचा अहवाल जानेवारी, २०१७ मध्ये प्रसिध्द झाला आहे. दोन्ही संस्थांनी राज्यातील सर्व जिल्हयातील शाळांचे सर्वेक्षण केले आहे. तथापि राज्यातील सहा जिल्हयात १२७ शाळांच्या सर्वेक्षणाचा अहवाल प्राप्त नाही.

(२) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व शासकीय शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार आवश्यक वर्गखोल्या, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, कुंपण इ. भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार प्रत्येक विद्यार्थ्यास शिक्षण मिळेल याबाबत शासन कटिबध्द आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) मध्ये अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता वसतिगृह बांधणेबाबत**

**(३४) * २६९१५ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता वसतिगृह बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हा प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन वसतिगृह बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अल्पसंख्यांक समाजातील उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात वसतिगृह बांधण्याची शासनाची योजना आहे. ज्या ठिकाणी वसतिगृह बांधावयाचे आहे, त्याठिकाणी उच्चशिक्षणाच्या सुविधा, जवळपासच्या शैक्षणिक संस्था व त्या परिसरातील अल्पसंख्याकांची लोकसंख्या इत्यादी बाबी दृष्टीसमोर ठेवून नाशिक जिल्हयात जागेचा शोध घेण्यात येत आहे. जागेच्या उपलब्धतेनुसार वसतिगृह बांधणेबाबत विचार करण्यात येईल.

दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या निवेदनास अनुसरुन जिल्हाधिकारी, नाशिक यांनी तहसिलदार, येवला यांना सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इयत्ता १२ वी इंग्रजी माध्यमातील समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात चुकीचा मजकूर छापल्याबाबत**

**(३५) * ३००६७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता १२ वी इंग्रजी माध्यमातील समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमात कुरुप मुलीमुळे पालकांना हुंडा द्यावा लागतो याचा समावेश करण्यात आला असल्याने शिक्षक व विद्यार्थ्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) राज्यमंडळास पुस्तकातील सदर मजकूर वगळण्याबाबत कळविण्यात आले आहे.

-----------------

**राज्यात वस्तुंवरील छापील एमआरपी किंमतीवर जादा वसुली करुन ग्राहकांची होत असलेली फसवणूक रोखण्याबाबत**

**(३६) * २८९३५ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.संजय दत्त, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई व ठाणे येथील दुकान, मॉल, मल्टीप्लेक्समध्ये वस्तुंवरील छापील एमआरपी किंमतीवर रूपये एक वा दोन ग्राहकांकडून बेकायदेशीरपणे वसूल करण्यात येत असल्याचे मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्याध्यक्षांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्राहकांची होणारी फसवणूक रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याप्रकरणी दिनांक ०४/०१/२०१७ रोजी मुंबई व ठाणे येथे मुंबई ग्राहक पंचायतीच्या स्वयंसेवकासमवेत वैधमापन शास्त्र विभागातर्फे तपासणी करुन दोषी आस्थापनांविरुध्द एकूण १७ खटले नोंदविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मिठी नदी दुषित करणाऱ्या अनधिकृत कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३७) * २६७१९ श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक २३८८६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदी दुषित करणाऱ्या अनधिकृत कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत विधानसभेमध्ये सन २०१५ च्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्तरात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत मिठी नदीच्या प्रदुषणास जबाबदार असलेल्या ९७ कारखान्यांवर उत्पादन बंद करण्याचे आदेश बजावण्याची कार्यवाही करण्यात आल्याचे मा.पर्यावरण मंत्री यांनी नमुद केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कार्यवाही होवूनही ९७ कारखान्यांचे उत्पादन सुरू असून या कारखान्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत ९७ उद्योगांपैकी ७२ उद्योग बंद आहेत. ३ कारखाने इतरत्र स्थलांतरीत झाले असून उर्वरित २२ उद्योग उत्पादनामध्ये बदल करून प्रदूषण विरहित उत्पादन करीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चनाखा (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील शालीवाहिना कंपनीतून होणाऱ्या प्रदुषणामुळे पिकांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(३८) * २८०५० श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चनाखा (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील शालीवाहिना कंपनीतून होणाऱ्या प्रदुषणामुळे परिसरातील पिकांचे नुकसान होवून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शालीवाहिना कंपनी विरोधात कारवाई करुन कंपनीकडून नुकसान भरपाईची वसुली शेतकऱ्यांना देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) प्राप्त माहितीनुसार सदर कंपनीने यापूर्वी वर्ष २०१६ मध्ये ११ शेतकऱ्यांना रुपये १,६०,०००/- इतकी मदत दिली होती. तसेच तालुका कृषी अधिकारी यांच्या अहवालानुसार, इतर ६ शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतची कार्यवाही चालू असून सदर कंपनीमुळे पिकांचे कोणतेही नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदुरबार तालुका क्रीडा संकुल भूमिपुजन झालेल्या ठिकाणी सुरु करण्याबाबत**

**(३९) * २८९८१ श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक २४६७२ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार तालुका क्रीडा संकुल शासनाच्या धोरणाप्रमाणे गेल्या ९ वर्षापूर्वी मंजूर झाले असून त्याचे भूमिपुजन नंदुरबार शहरातील जुन्या तहसिल कार्यालयाच्या समोरील जागेत झालेले असून सदय:स्थितीत संकुलाचे काम नंदुरबार शहराबाहेर १५ कि.मी. अंतरावर सुरु करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुका क्रीडा संकुल भूमिपुजन झालेल्याच ठिकाणी सुरु करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.क्रीडा मंत्री यांचेकडे दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) नंदुरबार तालुका क्रीडा संकुल उभारणी प्रकरणी निर्णय घेण्यासाठी तालुका क्रीडा संकुल समितीची बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## कलिना (सांताक्रुझ) मुंबई विद्यापीठाच्या उपहारगृह चालकाविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(४०) * २७९२९ ॲड.अनिल परब : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक २११०४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कलिना (सांताक्रुझ) मुंबई विद्यापीठाच्या उपहारगृहामध्ये एमआरपीपेक्षा जास्त दराने शितपेय विकत असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी वैधमापन शास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांकडे माहे डिसेंबर, २०१६ व जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित उपहारगृह चालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई विद्यापीठाच्या कलिना (सांताक्रुझ) येथील मे.आयसीएसएसआर कॅफेटेरिया (मे.गरुडा सपोर्ट सर्व्हिस प्रा.लि.) या आस्थापनेने शीतपेयाची जादा दराने विक्री केल्याने त्यांच्याविरूध्द खटला दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठाच्या कलिना व ठाणे कॅम्पस येथे वसतिगृह बांधण्याबाबत**

**(४१) * २७६८० अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी कलिना व ठाणे कॅम्पस येथे प्रत्येकी दोन अशा २०० विद्यार्थी क्षमतेच्या एकूण ४ वसतिगृहाच्या बांधकामाचे उद्घाटन तत्कालिन कुलगुरु यांच्या हस्ते करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चारही वसतिगृहाच्या बांधकामास सुरुवात झाली नसल्याचे तसेच वसतिगृहांच्या कामासाठी केंद्र शासनाच्या समाजकल्याण विभागाकडून शासनास प्राप्त झालेला रुपये १ कोटी ८० लाखांचा निधी अद्यापपर्यंत वापरला नसल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी प्राप्त होऊन एकाही वसतिगृहाचे बांधकाम सुरु न केल्याने वसतिगृह बांधकामासाठी प्राप्त झालेला निधी वेळीच खर्च न झाल्यामुळे सर्व निधी केंद्र शासनास समर्पित (surrender) करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन वसतिगृहाचे बांधकाम सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे. तत्कालीन कुलगुरु श्री.राजन वेळूकर यांच्या हस्ते कालिना परिसरातील वसतिगृहाचे भूमिपूजन करण्यात आले. तथापि, ठाणे परिसरातील वसतिगृहाचे भूमिपूजन करण्यात आले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर कामाच्या विविध मान्यता विहित वेळेत प्राप्त न झाल्यामुळे वसतिगृहाचे बांधकाम अद्याप सुरु होऊ शकलेले नाही. तथापि, केंद्र शासनास निधी समर्पित करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील माध्यमिक शाळेतील समुपदेकांना विशेष प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत**

**(४२) * २९५२८ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचव्या वेतन आयोगांतर्गत वेतनश्रेणी लागू करतांना माध्यमिक शाळेतील समुपदेशकांना रुपये २००/- चे विशेष वेतन मान्य करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहावा वेतन आयोग अंमलात आणताना समुपदेशकांना विशेष वेतन अथवा वरचा ग्रेड पे देण्यात आला नसून माध्यमिक शाळेतील विशेष वेतन घेणाऱ्या पर्यवेक्षक पदावरील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी वरचा ग्रेड पे देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यवेक्षक पदावरील शिक्षकांप्रमाणे ५३९ समुपदेशकांना ग्रेड पे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) होय, सहाव्या वेतन आयोगानुसार पर्यवेक्षक व समुपदेशक यांच्या ग्रेड वेतनामध्ये तफावत आहे. तथापि, सहावा वेतन आयोग लागू करतांना कोणत्याही संवर्गाला विशेष वेतन अनुज्ञेय ठरविले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याबाबत**

**(४३) * २८७०३ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय किंवा अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सहाव्या वेतन आयोगानुसार राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना वेतन मिळावे असा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत व त्यातील कर्मचा-यांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळावे यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय

(२) राज्यात एकूण ३४६ पदवी विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये असून संलग्नित पदवी अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबी संबंधित विद्यापीठाच्या व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारीत येत असल्याने याबाबत संबंधितांना कळविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४४) * २६७४६ श्री.नारायण राणे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आरोग्य क्षेत्रातील अन्न व औषध प्रशासन विभागात १ हजार १७६ पदे मंजूर असून केवळ ८११ पदांची भरती करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कामाचा ताण लक्षात घेऊन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनामध्ये गट-अ ते गट-ड या संवर्गातील ११७६ मंजूर पदांपैकी ७६८ पदे भरण्यात आलेली आहेत.

(२) रिक्त पदे पदोन्नतीने/सरळसेवेने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद आणि नागपूर येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(४५) * २८८८६ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १००३५ ला दिनांक १७ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे विधी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी सन २०१० मध्ये मान्यता मिळाली असूनही विधी विद्यापीठ सुरू झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद नंतर नागपूर येथे विधी विद्यापीठ स्थापन करुन त्याची सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाड्याच्या शैक्षणिक दर्जात भर पाडण्यासाठी शैक्षणिक वर्ष सन २०१७-२०१८ मध्ये औरंगाबाद येथे विधी विद्यापीठ सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नसून महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई, नागपूर व औरंगाबाद येथे स्थापनेस महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ अधिनियम, २०१४ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

(२) नागपूर येथे महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी स्थापन करण्याबाबत दिनांक १५ मे, २०१५ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली असून सदर विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून सुरू झाले आहे.

(३) सदर कायद्यात भारताचे न्यायमुर्ती किंवा त्यांची नामनिर्दिष्ट व्यक्ती, जी, सर्वोच्च न्यायालयाची वरिष्ठ न्यायाधीश असेल, ती, विद्यापीठाचे कुलपती असतील अशी तरतूद असून महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, औरंगाबाद च्या कुलगुरूंची नुकतीच नियुक्ती झाली असल्याने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सदर विद्यापीठ कार्यरत होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण महाविद्यालयात संगणक व लॅपटॉप खरेदीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत

**(४६) * २६८८६ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ७ शासकीय अभियांत्रिकी व ५१ तंत्रशिक्षण महाविद्यालये शासनामार्फत चालविली जात असून, सुमारे तीन हजार संगणक व लॅपटॉप खरेदीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयामध्ये १३४६ संगणकांची आवश्यकता असून मागील तीन वर्षापासून एकही संगणक खरेदी केला नसल्याने विद्यार्थ्यांना जुन्या संगणकावरच शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून उक्त महाविद्यालयांना संगणक खरेदीसाठी रुपये १३ कोटींची आवश्यकता असून रुपये ८ कोटींच्या निधीची तरतूद करण्याकरिता या अर्थसंकल्पात अनुदानात वाढ करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संगणक व लॅपटॉप खरेदीसाठी निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालये व शासकीय शैक्षणिक संस्था यांच्याकरिता ४४९० संगणक खरेदी करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) नाही.

(४) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कार्यालये व शासकीय शैक्षणिक संस्थांना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्वीय प्रपंजी लेख्यातून ४४९० संगणक उपलब्ध करुन देण्याची मागणी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडे नोंदविण्यात आली आहे. तसेच आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये यासाठी पुरेशी तरतूद केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शाळा इमारत बांधकामासाठी निधी देण्याबाबत**

**(४७) * २८१६४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २३४८७ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६ च्या हिवाळी अधिवेशनातील तारांकित प्रश्नाच्या उत्तरात बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीसाठी रुपये ९३ कोटीच्या खर्चास मंजुरीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे असे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हा परिषदेच्या २५७६ शाळांपैकी ३३८ शालेय इमारती धोकादायक झाल्या असून १६६ वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक शाळांच्या इमारत बांधकाम आणि दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करण्यास विलंब होत असल्यामुळे अनेक शाळेतील विद्यार्थ्यांना उघड्यावर शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती आणि नवीन इमारत बांधकामासाठी शासन केंव्हा निधी मंजूर करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

शाळेतील विद्यार्थ्यांची व्यवस्था सुस्थितीत असलेल्या वर्गखोल्यांमध्ये करण्यात आली आहे.

(४) यासंबंधीच्या प्रस्तावावर शासन स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## चंद्रपूर जिल्हयात दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

**(४८) * २६९२७ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ३७२ गांवे फ्लोराईडयुक्त पाण्याने बाधित असून इतर ४८८ गावांनासुध्दा दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याचे भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा संचालकाच्या दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फ्लोराईडयुक्त दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरीकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयात सन २०१४-१५ मध्ये रासायनिक तपासणी अभियानांतर्गत एकूण १३३१० स्त्रोतांपैकी ११२८० स्त्रोतांची तपासणी केली असता, त्यात ३७२ गावामध्ये फ्लोराईड आढळून आले आहे. तसेच सन २०१६-१७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार ४८८ गावातील स्त्रोत दूषित आढळून आले आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

फ्लोराईडयुक्त दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याने रुग्णांना अस्थीचे आजार व दातांचे आजारांना सामोरे जावे लागत आहे.

(३) फ्लोराईड बाधित ३७२ गावांपैकी ३२६ गावांत स्वतंत्र नळ योजना, प्रादेशिक नळ योजना, सौरऊर्जापंपाद्वारे शुध्द पाणी पुरवठा होत आहे. उर्वरीत ४६ गावांपैकी जलस्वराज्य-२ अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १५ गावे समाविष्ट आहेत. तर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत १३ गावांमध्ये कामे प्रगतीपथावर असून, सन २०१६-१७ मध्ये ५ गावे व सन २०१७-१८ मध्ये २ गावे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. तसेच ११ गावांचा समावेश जलस्वराज्य टप्पा-२ अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित आहे.

तसेच सन २०१६-१७ नुसार ४८८ गावातील दूषित स्त्रोतापैकी १६४ गावातील स्त्रोत फ्लोराईड बाधित, २५४ स्त्रोत नायट्रेडबाधित, १८ गावे टिडीएस बाधित, ४१ गावे आयर्नबाधित, ११ गावे क्लोराईड बाधित आहेत. त्यापैकी ४७८ गावांना शुद्ध पाणी पुरवठा होत आहे. उर्वरीत १० गावांपैकी २ गावांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना प्रगतीपथावर असून, उर्वरीत ८ गावे सन २०१७-१८ च्या रा.ग्रा.पे. कार्यक्रमाच्या कृती आराखडयात प्रस्तावित करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कलावंतांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत**

**(४९) * २६८५१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कलावंत सद्य:स्थितीत उपेक्षिताचे, दारिद्रयाचे तसेच हलाखीचे जीवन जगत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कलावंतांकरिता आश्वासने दिली असून त्यांची अंमलबजावणी झाली नसल्याने कलावंतांना सवलतीचा लाभ घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कलावंतांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) हे खरे नाही.

(३) लागू नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाडा विभागातील वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सामाजिक शास्त्राचे दुसरे पद पूर्णवेळ मंजूर करणेबाबत

**(५०) * ३०१९५ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील दोन विद्यापीठे सोडून इतर सर्व विद्यापीठांतर्गत वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सामाजिक शास्त्राच्या दोन पदांपैकी दुसरे पद पूर्णवेळ मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा विभागातील वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सामाजिक शास्त्राचे दुसरे पद पूर्णवेळ मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) विद्यापीठाने सुरु केलेल्या कला पदवी अभ्यासक्रमांतर्गत सामाजिक शास्त्र हा विषय येत असून या अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या चवथ्या पेपरचा कार्यभार अनुदान तत्वावर नसल्याने मराठवाडा विभागातील वरिष्ठ महाविद्यालयामध्ये सामाजिक शास्त्राचे दुसरे पद पूर्णवेळ मंजूर करण्यात आलेले नाही.

(३) सदर प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार मराठवाडा विभागातील वरिष्ठ महाविद्यालयात सामाजिक शास्त्राचे दुसरे पद पूर्णवेळ करण्यास मंजूरी देता येणार नाही, असा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठ (कलिना) परिसरात सीसीटीव्ही बसविण्याबाबत

**(५१) * २९४३६ श्री.जयंत पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठ (कलिना) परिसरातील गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही बसविण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून अर्थसंकल्पात सीसीटीव्हीसाठी तरतुद करण्यात आलेला ७५ लाख रुपयांचा निधी वापरला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीचा वापर न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, गेल्या वर्षीही सीसीटीव्हीसाठी राखीव ठेवण्यात आलेला रुपये २५ लाखांचा निधी न वापरल्याने स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेने असंतोष व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई विद्यापीठात सीसीटीव्ही बसविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर निधीचा वापर दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेरपर्यंत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) निधी वापरला जात आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना नियमित वेतन देण्याबाबत

**(५२) * २८५१९ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयात दिनांक २ मे, २०१२ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांना मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सुमोटो आदेशाने आणि त्यानंतरच्या शासन निर्णयानुसार नियमित करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, शिक्षकांच्या रिक्त पदावर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये व विद्यार्थ्यांना शिक्षक दयावेत या पालकांच्या मागणीमुळे शाळा व्यवस्थापनांनी नियमानुसार व आरक्षणानुसार नियुक्ती केलेल्या शिक्षकांना वेळोवेळी मागणी करुनही शिक्षणाधिकाऱ्यांनी अद्याप मान्यता न दिल्याने विनावेतन काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, तीन वर्षाचा सहाय्यक शिक्षक परिविक्षाधिन कालावधी पूर्ण केलेल्या शिक्षकांना नियमित न केल्याने कायदयाचे आणि मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होत असल्याने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) राज्यातील दिनांक २ मे, २०१२ नंतर वैयक्तिक मान्यता देण्यातबाबत अनियमितता झाली आहे. अशा प्रकरणी संबंधितांना सुनावणीची संधी देऊन निर्णय देण्याच्या सूचना आयुक्त (शिक्षण) यांनी दिनांक २४/२/२०१७ रोजी क्षेत्रिय अधिका-यांना दिल्या आहेत. याप्रकरणी जबाबदार अधिका-यांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई व आवश्यक वाटल्यास फौजदारी कारवाई करण्यासाठी गुणावगुणावर प्रकरण तपासून निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुध भेसळ रोखण्याबाबत

**(५३) * २८०३३ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक १६६९६ ला दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: जालना जिल्ह्यात ७० टक्के दुध भेसळयुक्त असल्याचे तसेच दुध भेसळीचे प्रमाण वाढले असून संपूर्ण राज्यातील दुधाची तपासणी किरकोळ स्वरुपाची असल्याची माहिती मा.दुग्धविकास राज्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात एका पत्रकार परिषदेत दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुध भेसळीमुळे राज्यातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुध भेसळ रोखण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) दिनांक ०३/०१/२०१७ च्या लोकमत वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## दादर (पूर्व) मुंबई येथील मॉडर्न इंग्लिश स्कुलने शुल्कवाढ केल्याबाबत

**(५४) * २८३३९ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (पूर्व) मुंबई येथील मॉडर्न इंग्लिश स्कुल, इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ चे कलम ४ (३) चे उल्लंघन करून सन २०१६-१७ या वर्षात अवास्तव शुल्क वाढ करून पालकांची आर्थिक लूट केल्याप्रकरणी विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांच्याकडे दिनांक २६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्मादाय आयुक्तांकडून प्राप्त वार्षिक अहवालानुसार सदर संस्था कोटयवधी रूपये नफ्यात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संस्थेविरूध्द कारवाई करून शुल्क वाढीचा निर्णय रद्द करुन वाढीव रक्कम पालकांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी संबधित शाळेच्या पालक शिक्षक संघाच्या सदस्यांनी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ अंतर्गत गठीत केलेल्या विभागीय शुल्क नियामक समिती, मुंबईकडे तक्रार दाखल केली असून त्यावर समितीमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्ले ग्रुप बंद करुन नर्सरीचे प्रवेश कायद्याच्या कक्षेत आणण्याबाबत**

**(५५) * २९१३१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक २६३४५ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, कल्याण व इतर काही भागात प्ले ग्रुप नर्सरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून या विनापरवाना प्ले ग्रुप नर्सरीमध्ये तसेच शाळेत देणग्या घेवून पालकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्ले ग्रुपमध्ये लहान मुलांच्या वयाचे बंधन ठेवले जात नाही तसेच सुरक्षिततेची कोणतीही उपाययोजना केली जात नसून रुपये १० हजार पासून ७० हजारापर्यंत फी आकारली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील प्ले ग्रुप पूर्णपणे बंद करुन नर्सरीचे प्रवेश कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) अशी कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणाबाबतचे धोरण व कायदा तयार करण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधक मंडळ, बालभारतीने प्रमाणापेक्षा जास्त पुस्तकांची छपाई केल्याबाबत**

**(५६) * २६८९२ श्री.संजय दत्त, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधक मंडळ बालभारतीमध्ये अनेक वर्षे पाठयपुस्तक छपाई व नियोजनाच्या कामात दिरंगाई होवून प्रमाणापेक्षा जास्त पुस्तकांची छपाई केली असल्याने बालभारतीचे जवळपास १ कोटी ७८ लाख ७२ हजार ९३८ रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षात इयत्ता ६ वी व ७ वी साठी २ कोटी ७ लाख २१ हजार ७९६ पुस्तकांची मागणी असताना छपाई मात्र २ कोटी १७ लाख ३६ हजार १०० पुस्तकांची करण्यात आल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रमाणापेक्षा जास्त छपाई केलेल्या पुस्तकांची रद्दी होत असल्याने आजपर्यंत हजारो मेट्रीक टन पुस्तकांची रद्दी झाल्याचा आरोप मजदूर संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार कोटयवधी रुपयांचे नुकसान करणा-या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दरवर्षी जूनमध्ये शाळांना पाठयपुस्तकांचा पुरवठा झाल्यानंतर काही जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांच्यामार्फत वाढीव मागणी प्राप्त होत असल्याने आणि पुस्तकांची खुली विक्री करण्याकरिता पाठयपुस्तकांचा जादा साठा (बफर स्टॉक) करावा लागतो.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य पात्रता चाचणी परिक्षेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५७) * २९३३५ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी घेण्यात येणा-या राज्य पात्रता चाचणी परिक्षेचा निकाल दिनांक २१ मे, २०१६ रोजी लागल्यानंतर पुन्हा पुरवणी निकाल जाहिर करण्यात आला असून या निकालात ६२२ परिक्षार्थी उत्तीर्ण होवून यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्य पात्रता चाचणी परिक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर त्याबाबत आलेल्या आक्षेपांचा विचार करुन, विषयतज्ञांची मान्यता घेऊन, सुधारित उत्तरतालिकेनुसार उत्तरपत्रिका तपासून, जाहिर केलेल्या पुरवणी निकालात ६२२ परीक्षार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. सबब, राज्य पात्रता चाचणी परिक्षेच्या निकालात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अट शिथिल करण्याबाबत

**(५८) * २९८३५ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३५% ची अट एआयसीटीई ने निश्चित केली असून राज्यात व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ५०% ची अट ठेवण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३५% ची अट कर्नाटक राज्यामध्ये असल्यामुळे सीमावर्ती भागातील विद्यार्थी महाराष्ट्र ऐवजी कर्नाटक राज्याला महत्व देतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणते धोरण निश्चित केले वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, धोरणाचे स्वरूप काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एआयसीटीई ने ३५% तर पदवी अभ्यासक्रमासाठी ४५% गुणांची अट निश्चित केली आहे. तथापि, राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमातील गुणवत्ता राखण्यासाठी अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना किमान ५०% व मागास प्रवर्ग/दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता किमान ४५% गुणांची अट लागू आहे.

(२) नाही. कर्नाटक राज्यामध्ये अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ४५% गुणांची अट आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही. तथापि, महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील उमेदवारांना Type E उमेदवार म्हणून राज्य शासनाच्या अभियांत्रिकी व तत्सम अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्याची तरतूद करण्यात आली आहे.

----------------

## राज्यातील प्लॅनमधील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्या नॉन प्लॅनमध्ये घेण्याबाबत

**(५९) * २६८१४ डॉ.अपूर्व हिरे, श्री.कपिल पाटील : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक १९७९२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १०० टक्के अनुदानावरील प्लॅनमधील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, वर्ग तुकड्या नॉन प्लॅनमध्ये घेण्याबाबतच्या प्रस्तावास दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्राप्त झाली असून सदर नस्ती अनौपचारीक संदर्भ प्राप्त करण्यासाठी वित्त विभागास सादर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागास सादर करण्यात आलेल्या उक्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी १०० टक्के अनुदानावरील शाळा व वर्ग तुकड्यांना नॉन प्लॅनमध्ये घेण्यासंबंधी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाली नसल्यास, ती केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक २७ जानेवारी, २०१७ अन्वये, सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पापासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, योजनांतर्गत व योजनेतर असे दर्शविले जाणारे विभाजन आता बंद करण्यात आले आहे. वेतन, निवृत्तीवेतन, व्याजप्रदाने इत्यादींचा खर्च अनिवार्य खर्चामध्ये वर्गीकृत करण्यात आलेला आहे.

----------------

**चंद्रपूर जिल्हयातील नद्या प्रदुषण मुक्त करण्याबाबत**

**(६०) * २९६८८ श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील पैनगंगा, वैनगंगा, वर्धा, अंधारी, उमा, शिरना, इरई, झरपट आदि नद्या प्रदुषित झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदयांची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार उक्त नद्या प्रदुषण मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) अंशत: हे खरे आहे.

(२) महानगरपालिका/नगरपरिषदांना सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविण्याकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्देश दिलेले आहेत.

पाटबंधारे विभागाने इरई नदी पुनरुज्जीवन कार्यक्रम हाती घेतला असून कामे प्रगतीपथावर आहेत

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**एव्हॉन लाईफ सायन्सेस कंपनीवर कारवाई करण्याबाबत**

**(६१) * २७२३२ श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २४०८० ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे इफेड्रीन अंमलीपदार्थाच्या साठयाशी संबंधित असलेल्या एव्हॉन लाईफ सायन्सेस कंपनीची माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तपासणी करताना अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी निष्काळजीपणा दाखविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इफेड्रीन अंमलीपदार्थाच्या सापडलेल्या साठयासंबंधी तसेच विभागाच्या अधिका-यांनी केलेल्या निष्काळजीपणाबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) माहे एप्रिल, २०१६ मध्ये मे.एव्हॉन लाईफ सायन्सेस, चिंचोली, सोलापूर या कंपनीमधून ठाणे पोलिसांनी इफेड्रीनचा साठा जप्त केल्याच्या वर्तमानपत्रातील बातम्यांच्या अनुषंगाने, अन्न व औषध प्रशासनाच्या गुप्तवार्ता शाखेच्या पथकाने माहे एप्रिल, २०१६ मध्ये तपासणी केली आहे. सदर तपासणी अहवालाच्या अनुषंगाने, अन्न व औषध प्रशासनाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**इंदापूर (जि.पुणे) तालुक्यात गुटखा विक्री होत असल्याबाबत**

**(६२) * २७१३६ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर (जि.पुणे) तालुक्यात शासनाने गुटखाबंदी केली असतानाही अनेक ठिकाणी गुटखा उपलब्ध होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मानसेवी शिक्षकांना मासिक मानधन तसेच वेतन देण्याबाबत**

**(६३) * २९२७८ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठी भाषा फाऊंडेशन योजनेंतर्गत मानसेवी शिक्षक म्हणून कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या शिक्षकांना थकीत मासिक मानधन तसेच वेतन देण्याची मागणी पदवीधर मानसेवी संघटना (जि.यवतमाळ) यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या दिनांक २५/१/२०१७ च्या पत्रान्वये ४७ मानसेवी शिक्षकांना मानधनाची ५०% रक्कम सदर शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यात आली असून उर्वरित ५०% रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील जलसुरक्षकांना मानधन देण्याबाबत

**(६४) * २८४९१ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील ग्रामपंचायतीमध्ये गावातील नागरिकांना शुध्द पाणी मिळण्याकरिता नेमण्यात आलेल्या ८६९ जलसुरक्षकांना मानधन मिळत नसून पाण्याचे नमुने तपासणीकरिता प्रयोगशाळेपर्यंत घेवून जाण्याइतके अनुदानही मिळत नसल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलसुरक्षकांना मानधन तथा अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

परंतु सन २०१४-१५ या वर्षाकरीता जिल्हास्तरावरुन रुपये २४,४४,०६०/- प्रोत्साहनपर अनुदान सातही पंचायत समितींना दिनांक १८/११/२०१६ चे आदेशान्वये दिले आहे. व सन २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षाकरीता गटविकास अधिकारी यांची मागणी आल्यानंतर पुढील अनुदान वितरणाची कार्यवाही तातडीने करण्यात येणार आहे.

(२) व (३) याबाबत सर्व संबंधित गटविकास अधिकारी यांना जिल्हा प्रशासनाकडून कारणे दाखवा नोटीस दिली आहे व १५ दिवसाचे आत निधी वितरीत करणेबाबत व सन २०१५-१६ व २०१६-१७ चे मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत कडक सुचना दिल्या आहेत.

-----------------

**राज्यातील पाषाण शाळेला अनुदानित मान्यता देण्याबाबत**

**(६५) * २८२८९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालकांनी पाषाण शाळांबाबत शासनाला अहवाल सादर करुन संबधित शाळांना विशेष बाबींतर्गत अनुदानित मान्यता देण्यास दिलेल्या नकाराच्या पत्राला मा. मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने निर्णय घेवून पाषाण शाळातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यातील तरतूदीप्रमाणे विशेष बाबींतर्गत अनुदानित मान्यता द्यावी व शासनस्तरावर शालेय योजनांचा लाभ मिळावा यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार प्रदान केल्यामुळे जेथे शाळेची सुविधा उपलब्ध होणार नाही अशा बालकाचे शिक्षण नजीकच्या शाळेत होणे आवश्यक आहे. त्यानुसार दगडखाण क्षेत्रातील केंद्रांमध्ये शिकत असणाऱ्या सर्व मुलांना नियमित शाळेत दाखल करुन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी वाहतूक व्यवस्था प्रस्तावित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे जिल्ह्यांना आदेश देण्यात आले आहेत. वार्षिक कार्य योजना व अंदाजपत्रक सन २०१७-१८ मध्ये वाहतूकीसाठी दगडखाण क्षेत्रातील मुलांची संख्या प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यामुळे इथून पुढील कालावधीत दगडखाण क्षेत्रातील मुलांच्या ने-आण ची व्यवस्था शासकीय खर्चाने नियमित शाळेत करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत**

**(६६) * २७९७९ श्री.जयवंतराव जाधव, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४३४६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे गोरेगावच्या धर्तीवर दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याकरिता नाशिक विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक २७ ऑगस्ट, २००९ रोजी १० कोटी नियतव्यय निश्चित केल्यानुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी मुंढेगाव (ता.इगतपुरी) येथील जागा सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे हस्तांतरीत करण्याकरिता महसूल व वन विभागास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चित्रपट सृष्टीसाठी सांस्कृतिक कार्य विभागास जमिनीचे हस्तांतरण करून सदर चित्रपटसृष्टीचे काम सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) चित्रपटसृष्टीसाठी प्रस्तावित जमीन सांस्कृतिक कार्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यास महसूल व वन विभागास विनंती करण्यात आली असून याबाबत त्या विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री.नित्यानंद एज्युकेशन ट्रस्ट, निंबवली (ता.वाडा, जि.पालघर) येथील शिक्षकांना निलंबित केल्याबाबत

**(६७) * २७६४३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.नित्यानंद एज्युकेशन ट्रस्ट निंबवली (ता.वाडा, जि.पालघर) येथे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केली म्हणून संदिप ठाकरे, हर्षल जाधव व भावना घाटाळ या शिक्षकांना निलंबित करण्यात आल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील डाईंग कंपन्यांच्या प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(६८) * २८९५७ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात तसेच शहर आणि ग्रामिण भागात साईराम डाईंग व इतर डाईंग मालकांनी मोठ्या प्रमाणात डाईंग कंपन्या सुरु केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त डाईंग कंपन्या नागरी वस्त्यांमध्ये असल्याने डाईंग कंपन्यांतून निघणाऱ्या विषारी वायूमुळे स्थानिक नागरिकांना त्रास होत असून त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डाईंग कंपन्यांच्या मालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्देशित केलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन केलेल्या ५ उद्योगांना प्रस्तावित आदेश व एका उद्योगाला बंदचे आदेश बजावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग आणि मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील किनाऱ्यावरील अनधिकृत बांधकामाबाबत**

**(६९) * २६७२० श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक २१८४५ ला दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग आणि मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील किनाऱ्यावरील अनधिकृत बांधकामाबाबत माहे मार्च, २०१५ मध्ये विधानपरिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही बांधकामांवर कारवाई करण्यात आली व उर्वरित बांधकामावर सहाय्यक संचालक नगररचना, रायगड-अलिबाग यांचा अहवाल प्राप्त झाल्यांनतर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ नुसार कारवाई करण्याचे जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांनी त्यांच्या अहवालात नमुद केले आहे असे मा.मंत्री पर्यावरण यांनी दिलेल्या उत्तरात नमुद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अहवालाच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकामाबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अहवालानुसार, किना-यावरील अनधिकृत बांधकाम प्रकरणी अलिबाग तालुक्यात ६९ व मुरुड तालुक्यात ९५ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे अलिबाग तालुक्यात ११ व मुरूड तालुक्यात ७ बांधकामे निष्कासित करण्यात आलेली असून अनुक्रमे ६१ व ९५ प्रकरणात न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी वसतिगृह बांधण्याबाबत**

**(७०) * २८२२८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४३ शहरांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी सुसज्ज वसतिगृह बांधण्याचा निर्णय शासनाने सन २०१० मध्ये घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयाला ७ वर्ष उलटूनही केवळ १० वसतिगृहाचे काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित वसतिगृह बांधण्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी प्रत्येक जिल्हयात वसतिगृह बांधण्यास दिनांक २/३/२०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यातील विद्यापीठांच्या जागेवर अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतिगृह सुरू करणेसंदर्भात शासन निर्णय दिनांक २०/१२/२०११ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्याचबरोबर केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत देखील वसतिगृह बांधण्यात येत आहेत.

(२) आतापर्यंत एकूण १८ ठिकाणी वसतिगृह कार्यान्वित झाली आहेत.

(३) अद्याप २३ वसतिगृहांची बांधकाम प्रक्रिया सुरु असून बांधकामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने निधी देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी क्षेत्रातील शाळांना अनुदान देण्याबाबत

**(७१) * २९००२ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी क्षेत्रातील ५० टक्के आदिवासी विदयार्थी संख्या असलेल्या १०१ शाळांना १०० टक्के अनुदान देण्याचे सन २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासन निर्णय होऊनही या शाळांना अनुदान देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त शाळांना आर्थिक वर्षात अनुदान देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. आदिवासी क्षेत्रातील ५० टक्के आदिवासी विद्यार्थी संख्या असलेल्या ९९ शाळांना आदिवासी विकास विभागाने अनुदान पात्रतेसंदर्भात कार्योत्तर मंजूरी दिली आहे.

(२) सदर शाळांना १०० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सर्वशिक्षा अभियानामार्फत विद्यार्थ्यांसाठी पाठयपुस्तकांची योजना राबविण्याबाबत

**(७२) * २७९३८ अ‍ॅड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, अ‍ॅड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वशिक्षा अभियानामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणारी मोफत पाठयपुस्तक योजना बंद करुन त्याऐवजी विद्यार्थ्यांच्या खात्यावर रोख रक्कम जमा करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे शासनाला रुपये ३० ते ३५ कोटींचा तोटा होणार असून व्यापाऱ्यांचा फायदा होत आहे, ही खरे आहे काय,

(३) तसेच, शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक शुल्क मदत यासारख्या योजनांचे अनुदान खात्यावर जमा झाले नसून सदरच्या योजनेचे अनुदान मिळणार नसल्याने राज्यात सर्वशिक्षा अभियान बंद पडण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी व निर्णयाचा फेरविचार करुन राज्य शिक्षण मंडळाच्या बालभारतीला पाठ्यपुस्तके पुरवठा सुरू ठेवण्याबाबत व गोरगरीबांच्या मुलांना पुस्तके उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) शालेय वर्ष सन २०१७-१८ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत रोख रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा न करता पाठयपुस्तकांचा पुरवठा करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या परिपत्रकातील अट रद्द करण्याबाबत**

**(७३) * २७७३६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्र महाविद्यालयामधून पाच व तीन वर्षांचा एल.एल.बी चा अभ्यासक्रम पूर्ण करुन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना न्यायालयामध्ये वकिली करता येणार नाही, असे बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) ने परिपत्रक जाहीर केले असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशाच्या प्रत्येक नागरिकास कोणत्याही वयात शिक्षण घेण्याचा व नोकरी करण्याचा भारतीय राज्य घटनेने अधिकार बहाल केला असताना अशाप्रकारचे परिपत्रक जारी करुन राज्य घटनेचे उल्लंघन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी रात्र महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सदरची परिपत्रकातील अट रद्द करण्याबाबतची निवेदने मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तसेच प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडे माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात सादर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निर्णयाचा फेरविचार करुन बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) ने जाहीर केलेले संदर्भिय परिपत्रक रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या मान्यतेशिवाय सुरु असणाऱ्या विधी अभ्यासक्रमातुन उत्तीर्ण उमेदवारास न्यायालयात वकिली करण्याचा अधिकार असणार नाही अशी शिफारस बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या लिगल एज्युकेशन कमिटीने केलेली आहे. त्यास अनुसरुन बार कौन्सिल ऑफ इंडियाने दिनांक ७/१२/२०१६ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व विद्यापीठे व विधी महाविद्यालयाकडून Evening Classes चालविण्यासंदर्भात स्पष्टीकरण मागविलेले आहे.
(२) हे खरे नाही.

सदर पत्रान्वये कोणत्याही नागरिकास विधी शिक्षण घेण्यापासून वंचित करण्यात आलेले नाही.
(३) अंशत: खरे आहे.

विधी महाविद्यालय, ठाणे येथील ३ वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी दिनांक २८/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विधी अभ्यासक्रमाचे वेळापत्रकाबाबत पुनर्विचार करण्याची विनंती बार कौन्सिल ऑफ इंडियाला केलेली आहे व शासनास प्रत सादर केलेली आहे.
(४) सदर बाब बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या अखत्यारितील असल्याने शासनस्तरावरील कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७४) * २८७१५ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक २५४७६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वाढीव पद भरतीसाठी विद्यापीठाने शासनाकडे प्रस्ताव सादर करुनही वाढीव पदाना मंजूरी देण्यात आली नसल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाढीव पद भरतीस मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

या विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या अकृषि विद्यापीठांमधील मंजूर पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठांची शिक्षक व शिक्षकेतर पदांची माहिती मागविण्यात आलेली आहे. तथापि, विद्यापीठाची शिक्षकीय व शिक्षकेतर पदांची परिपूर्ण माहिती अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मुलींची शिक्षणातील गळती रोखण्यासाठी मानव विकास कार्यक्रम राबविण्याबाबत

**(७५) * २६७४९ श्री.नारायण राणे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुलींची शिक्षणातील गळती थांबावी यासाठी शासनाने मानव विकास कार्यक्रम सुरु केला असून या योजनेतून इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना सायकल वाटप, एसटी महामंडळाची मोफत बससेवा इत्यादी सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील ३०० मुलींना या योजनेतून सायकली देण्यासाठी प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून शिक्षण विभागाच्या उदासीनतेमुळे अद्यापपर्यंत सायकलींचे वाटप करण्यात आले नसून एक महिन्यात निधीचा वापर न केल्यास निधी पुन्हा शासनाकडे जमा होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करुन विद्यार्थीनींना सायकलींचे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) नाही.

निधी जिल्हा परिषदेमार्फत संबंधित गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे दिनांक १०/३/२०१७ रोजी वितरीत करण्यात आला आहे.

-----------------

**टेंभुर्णी (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथील जिल्हा परिषदेच्या मराठी व उर्दु माध्यमाच्या शाळांना पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७६) * २८८९० श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक २५१९९ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभुर्णी (ता.जाफ्राबाद, जि.जालना) येथील जिल्हा परिषदेच्या मराठी व उर्दु माध्यमाच्या शाळेच्या इमारतीसह जिल्ह्यात पाचशे शाळा जीर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेंभुर्णी येथील एकुण १४ वर्ग खोल्यांपैकी सात वर्ग खोल्यांचे पत्रे फुटलेले असुन २ वर्ग खोल्या माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पावसाने पडल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषदेच्या शाळांच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती, मैदान, स्वच्छतागृह पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

जालना जिल्हयातील १६० शाळांमधील ३७५ वर्गखोल्या मोडकळीस आल्या आहेत.

(२) नाही.

(३) जिल्हा परिषद शाळांना नवीन वर्गखोली बांधकाम, वर्गखोली दुरूस्ती, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा इ. भौतिक सुविधा सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१७-१८ च्या मंजूर निधीमधून उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच नवीन वर्गखोली बांधकामासाठी जिल्हा वार्षिक योजनांतर्गत मंजूर निधीमधूनही तरतूद उपलब्ध करून देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## सोलापूर जिल्हयातील महानगरपालिका व नगरपालिका शाळांचे वेतन विलंबाने होत असल्याबाबत

**(७७) * २७१५१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील महानगरपालिका व नगरपालिकामार्फत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा चालविण्यात येत असून सर्व शाळांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला करण्याचे शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन आदेशाने महानगरपालिका व नगरपालिका कार्यक्षेत्रातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे वेतन सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात १ तारखेला झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

वेतन पथक माध्यमिक सोलापूर यांचेमार्फत नगरपालिका संचलित २ माध्यमिक शाळांचे वेतन अदा करण्यात येत होते. तथापि, शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०१४ अन्वये महानगरपालिका संचलित ६ माध्यमिक शाळांचे वेतन, वेतन पथकामार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर शाळांची माहिती विलंबाने प्राप्त झाल्याने तसेच वेतनासाठी वाढीव तरतुदीची आवश्यकता भासल्याने वेतन अदा करण्यास विलंब झालेला आहे. मात्र सदरच्या त्रुटी दूर करण्यात आल्या असून वेतन अदा करण्याची कार्यवाही तातडीने अदा करण्यात येत आहे.

-----------------

**नागपूर विद्यापीठातून पूरातन नाणी गहाळ झाल्याबाबत**

**(७८) * २७०४० प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक २१४१८ ला दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विद्यापीठातील पूरातन विभागातून ४ महिन्यांपूर्वी सन १९६७ पासूनची कोटयवधी किंमतीची प्राचीन पूरातन नाणी गहाळ झाल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विद्यापीठातील प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृति आणि पुरातत्व विभाग येथून गहाळ झालेल्या प्राचीन वस्तूबाबत विद्यापीठाद्वारे दिनांक १९ मे, २०१६ रोजी पोलीस स्टेशन, अंबाझरी, नागपूर शहर येथे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी आवश्यक चौकशी व तपास करुन दिनांक १३ फेब्रुवारी, २०१७ रोजी विद्यापीठाला कळविल्यानुसार सदर प्रकरणी दिनांक ०१ मार्च, २०१७ रोजी F.I.R. No.००७२ दिनांक ०१/०३/२०१७ भारतीय दंड संहिता १८६० कलम ३८० अंतर्गत पोलीस स्टेशन, अंबाझरी, नागपूर शहर यांचेद्वारे नोंदणीची कार्यवाही झालेली आहे. सदर प्रकरणी संबंधित पोलीस विभागाद्वारे तपासाची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई विद्यापीठातर्फे कर्मचा-यांच्या नियुक्त्यांमध्ये झालेली अनियमितता**

**(७९) * २६८५३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातर्फे मागील काही वर्षापासून झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांपैकी ६० टक्के नियुक्त्यांमध्ये अनियमितता झाल्याचे तसेच विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या पदांचा आढावा घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या टास्कफोर्सने आपला अहवाल व सादरीकरण उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांकडे दिल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी टास्कफोर्सने दिलेल्या अहवालात अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या नियमानुसार झाल्या नसल्याचे, रोस्टर प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याचे तसेच अनुदानित तत्वांवरील जागांवर विनाअनुदानित व विनाअनुदानित जागांवर अनुदानित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे नमूद केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन टास्कफोर्सने सादर केलेल्या अहवालानुसार दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे. मुंबई विद्यापीठातील एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमध्ये प्रवेशित न झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत निर्माण झालेल्या अडचणीसंबंधात तातडीने उपाययोजना करण्यासाठी स्थापित कार्यबल गटाने त्याचे सादरीकरण तसेच अहवाल शासनास सादर केलेला आहे.

(२) व (३) कार्यबल गटाने शासनास सादर केलेल्या अहवालात अनुकंपा तत्वावरील काही नियुक्त्या नियमानुसार झालेल्या नसल्याचे, काही नियुक्त्या बिंदुनामावलीनुसार नसल्याचे तसेच काही विनाअनुदानित पदांवर अनुदानित कर्मचारी व अनुदानित पदांवर विनाअनुदानित कर्मचाऱ्यांच्या बदल्या केलेल्या असल्याचे नमूद केले आहे. सदर अहवालावर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अपंग शिक्षकांना अतिरिक्त प्रवास भत्ता व अन्य सुविधा देण्याबाबत

**(८०) * २८५२४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंग शिक्षकांना अतिरिक्त प्रवास भत्ता व अन्य सुविधा देण्याबाबत शासनस्तरावरून योग्य निर्णय होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंगाना विशेषाधिकार व उचित संरक्षण देण्याची हमी देण्याबाबत शासनाकडून विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) याबाबत वित्त विभागाच्या दिनांक ०३/०६/२०१४ च्या शासन निर्णयानुसार पात्र कर्मचाऱ्यांना वाहतुक भत्ता अनुज्ञेय आहे.

-----------------

## शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन संस्थाचालकांनी केलेल्या बेकायदेशीर नियुक्त्या

**(८१) * २८०४१ प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक २५६१८ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक भरतीवर शासनाने निर्बंध घालूनही शासनाच्या ना हरकत प्रमाणपत्राशिवाय भरती केल्याचे आढळून आल्यास प्राधिकृत अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २ मे, २०१२ नंतर दिलेल्या नियुक्त्यांना मान्यता देवून ना हरकत प्रमाणपत्राशिवाय करण्यात आलेल्या नियुक्त्या बेकायदेशीर ठरविण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपावेतो किती नियुक्त्या बेकायदेशीर ठरविलेल्या आहेत व किती प्राधिकृत अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्यातील दिनांक २ मे, २०१२ नंतर वैयक्तिक मान्यता देण्याबाबत अनियमितता झाली आहे. अशा प्रकरणी संबंधितांना सुनावणीची संधी देऊन निर्णय देण्याच्या सूचना आयुक्त (शिक्षण) यांनी दिनांक २४/२/२०१७ रोजी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई व आवश्यक वाटल्यास फौजदारी कारवाई करण्यासाठी गुणावगुणावर प्रकरण तपासून निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नववी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता जलदगती शिक्षण पध्दत योजना सुरु करण्याबाबत

**(८२) * २९८८६ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१६ या शैक्षणिक वर्षात नववीत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या दीड लाख असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शालेय शिक्षण विभागाने अशा नववी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी (जलदगती शिक्षण पध्दत) ही आक्रमक योजना आखली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नववी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता असलेली योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ अन्वये राज्यात जलद गतीने शिक्षण पध्दती राबविण्यासंदर्भात कार्यक्रम घोषित केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ज्येष्ठ कलाकारांच्या सेवानिवृत्ती वेतनात वाढ करण्याबाबत**

**(८३) * २७०१६ श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल : तारांकित प्रश्न क्रमांक १२३४३ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने ज्येष्ठ कलाकारांच्या सेवानिवृत्ती वेतनात रुपये २१०० वाढ करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ज्येष्ठ कलाकारांच्या सेवानिवृत्ती वेतनामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. दिनांक १५ ऑगस्ट, २०१४ पासून राज्यातील मान्यवर वृध्द साहित्यिक व कलाकार इत्यादींना मानधन योजनेंतर्गत त्यांच्या मानधनाच्या रक्कमेत दीडपटीने वाढ करण्यात आली असून त्यांना खालीलप्रमाणे मासिक मानधन देण्यात येते.

अ वर्ग कलावंत - रुपये २,१००/-
ब वर्ग कलावंत - रुपये १,८००/-
क वर्ग कलावंत - रुपये १,५००/-

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इंग्रजी शाळांमधील मागास व विशेष मागास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याबाबत**

**(८४) * २९८३६ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षणाचा मूलभूत अधिकार (आरटीई) अंतर्गत खाजगी विनाअनुदानित इग्रंजी माध्यमाच्या शाळांना मागासलेल्या व विशेष मागास प्रर्वगातील विद्यार्थ्यांना १५ टक्के जागा राखीव ठेवण्याचा तसेच पात्र विद्यार्थी यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने शैक्षणिक वर्षात लाभार्थी विद्यार्थ्यांना योजनेचा फायदा होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, किती कालावधीपर्यंत शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. तथापि, शिक्षणाचा मुलभूत अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी अल्पसंख्यांक शाळा वगळता इतर सर्व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शाळात २५ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत.

(२) व (३) शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाईन करण्यात आली असून प्रवेशित बालकांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रुपये २४.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनधिकृत खाजगी कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(८५) * २६९६३ डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २३८१० ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनधिकृतरित्या चालविण्यात येणाऱ्या खाजगी क्लासेसवर शालेय शिक्षण विभागाने नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने कोचिंग क्लास नियंत्रक कायदा अंमलात आणण्याबाबत तसेच शिक्षणाचा दर्जा सुधारणेबाबत समर्थन या संस्थेने दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. शालेय शिक्षण मंत्री, तसेच सचिव, शालेय शिक्षण यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्टुंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) या अखिल भारतीय पातळीवरील संघटनेने सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती तसेच विधी व न्याय विभागाने कोचिंग क्लासेसवरील निर्बंधाबाबतचे सन २००० मध्ये व्यपगत झालेल्या विधेयकातील तरतुदी व मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या श्री.अशोक प्रधान समितीच्या शिफारशी विचारात घेवून नविन विधेयकाचे प्रारुप तयार करता येईल असे अभिप्राय दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अभिप्रायाच्या अनुषंगाने अभ्यास समिती नेमण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत खाजगी क्लासेस चालकांवर कारवाई करुन विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) विधेयक तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) व (३) होय.
(४) व (५) समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर शासन त्यासंबंधी पुढील निर्णय घेईल.

-----------------

**मुंबई शहरातील रुग्णालयात रुग्णांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(८६) * २९७८८ श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील रुग्णालयात वापरण्यात येणारी पॅकबंद उपकरणे व वस्तूंवर घोषित केलेली किंमत तसेच त्यावरील छापील माहितीत खाडाखोड करुन रुग्णांची फसवणूक होत असल्याचे वैद्य मापनशास्त्र विभागाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या कारवाईत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या रुग्णालयाने छापील किंमतीपेक्षा जास्त दर आकारुन रुग्णांची फसवणूक केली आहे, त्यांची नावे काय आहेत,
(३) असल्यास, वैद्य मापनशास्त्र अधिनियमानुसार उक्त रुग्णालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) जानेवारी २०१७ मध्ये रुग्णालयांची तपासणी केली असता मे.फोर्टीस हॉस्पिटल, भांडूप मुंबई यांचेविरुध्द एक आवेष्टित वस्तू फॅब्रिल नॅचरल फायबर १०० ग्रॅ. वरील किंमतीत खाडाखोड केल्याबद्दल व मे.ब्रीच कँडी हॉस्पिटल यांचेविरुध्द बॅंडेज रोल पॅकेज व कॉटन क्रीप बॅंडेज या आवेष्टित वस्तूवरील किंमतीत बदल केल्याबाबत खटले दाखल केले आहेत.

(२) व (३) कोणत्याही रुग्णालयामध्ये छापिल किंमतीपेक्षा जास्त दर आकारल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि एक आवेष्टित वस्तू फॅब्रिल नॅचरल फायबर १०० ग्रॅ. वरील किंमतीत खाडाखोड केल्याबद्दल मे.फोर्टीस हॉस्पिटल, भांडूप मुंबई यांचेविरुध्द व बँडेज रोल पॅकेज व कॉटन क्रीप बँडेज या आवेष्टित वस्तूवरील किंमतीत बदल केल्याबाबत मे.ब्रीच कँडी हॉस्पिटल यांचेविरुध्द तसेच मे.लिलावती हॉस्पिटल, बांद्रा, मे.कोकिलाबेन धिरुभाई अंबानी हॉस्पिटल, अंधेरी, मे.एशियन हार्ट इन्स्टिट्युट, बांद्रा, मे.ग्लोबल हॉस्पिटल, परेल, मे.डॉ.एल.एच.हिरानंदानी हॉस्पिटल, पवई, मे.सर एच.एन. हॉस्पिटल (रिलायन्स फाऊंडेशन) यांचेविरुध्द इतर उल्लंघनाबाबत खटले दाखल केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीक्षेत्र लेण्याद्री (पुणे) येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होत असल्याबाबत

**(८७) * २७१३९ श्री.अनिल भोसले, अ‍ॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अष्टविनायकांपैंकी एक असलेले श्रीक्षेत्र लेण्याद्री (पुणे) येथे वर्षभरात लाखो भाविक दर्शनासाठी येत असून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची व भक्तांची पुरातत्व विभाग शुल्क आकारणी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी शुल्क आकारुनही पुरातत्व विभागाकडून स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याने घाणीचे साम्राज्य पसरले आहे तसेच डोंगराची व खडकाची ऊन, वारा व पाऊस यामुळे झीज होवुन भेगा पडल्याने अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लेण्याद्री येथे पुरातत्व विभागाकडून शुल्क आकारणी रद्द करुन पर्यटकांना योग्य सोयी-सुविधा देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

जानेवारी, २०१७ मध्ये श्रीक्षेत्र लेण्याद्री येथे प्रवेश शुल्क आकारला जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

श्रीक्षेत्र लेण्याद्री ही वास्तू राष्ट्रीय संरक्षित असून सदर वास्तू केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडलाच्या अधिपत्याखाली आहे. सदर कार्यालयाकडून यासंदर्भात प्राप्त माहितीच्या आधारे असे नमूद करण्यात येते की, सन १९९६ मध्ये जुन्नर येथील बौध्दकालीन लेण्या समूहास प्रवेश फी आकारण्यात आली. सदर समूहात लेण्याद्री लेण्यांचा ही समावेश असल्याने या लेण्यासही प्रवेश शुल्क आकारण्यात आला. फक्त लेण्याद्री येथील मंदिरासाठी स्वतंत्र शुल्क आकारण्यात आलेले नाही.

(२) जुन्नर येथील बौध्दकालीन लेण्या समूहाच्या जतन संवर्धनासंदर्भात केंद्रीय सर्वेक्षण मंडळाने योग्य ती दक्षता घेतली असून जतन संवर्धनाच्या कामासाठी रुपये ६०.०० लाख इतका निधी खर्च केला आहे. तसेच लेणीवर जाण्यासाठी पायऱ्यांचे रुंदीकरण, संरक्षक कुंपण, पायवाटा तसेच चढताना शरीरास आधार म्हणून कठडे व इतर संरक्षक सुविधा निर्माण करण्यात आले आहे. तसेच हा परिसर स्वच्छ ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील विद्यार्थ्यांना शुल्क माफी देण्याबाबत**

**(८८) * २९२८१ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात सन २०१५-२०१६ मध्ये शासनामार्फत इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना शुल्क माफी देण्याचा निर्णय घेऊनही मुख्याध्यापकांनी योग्य ती माहिती शिक्षण मंडळाकडे न दिल्याने सुमारे ७ हजार विद्यार्थी शुल्क माफीपासून वंचित राहिल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार शुल्क माफीपासून वंचित विद्यार्थ्यांना शुल्क माफीची भरलेली रक्कम अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.यवतमाळ यांचेकडून इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या एकूण ५७९१ एवढया पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव (प्रमाणपत्रासह) संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडून प्राप्त करुन घेण्यात आलेले आहेत. त्यापैकी इयत्ता १२ वी च्या १,०५७ विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती संबंधित शाळांना करण्यात आली आहे व ४३७४ विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची प्रक्रिया सुरु आहे व उर्वरित ३६० विद्यार्थ्यांच्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

----------------

## मुंबई येथील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(८९) * २८४९२ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन संचमान्यतेच्या त्रुटी दूर करण्यासाठी तसेच अनेक वर्षापासून कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांच्या प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी मुंबईत कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांना केवळ आश्वासनाखेरीज काहीच दिले नसल्याने शिक्षकांच्या संघटनेने आझाद मैदान येथे जेलभरो आंदोलन करण्याचे घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या मान्य न झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा विपरित परिणाम होत असल्याने त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनाकडून त्यांच्या मागण्यांबाबत दिनांक १२/१/२०१७ व १८/२/२०१७ रोजी निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनस्तरावर संघटनेबरोबर बैठक घेण्यात आली आहे व त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगांव (मुंबई) येथील**
**प्रशासनात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(९०) * २७०२८ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगांव (मुंबई) येथील प्रशासनात गैरव्यवहार होत असल्याचे तसेच व्यवस्थापकीय संचालकांनी नियमांचे उल्लंघन करुन गैरव्यवहाराचे आरोप असलेल्या लेखा परिक्षक अधिकाऱ्याला अत्युकृष्ट कामगाराचे प्रशस्तीपत्रक दिल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चित्रनगरीत असलेल्या मेकअप रुमपासून कोणतेही उत्पन्न मिळत नसल्याने नविन मेकअप रुम बांधण्यासाठी करोडो रुपये खर्च केले असून चुकीच्या पध्दतीने टेंडर पास केल्यामुळे व्यायाम शाळेचे, रस्त्याचे व गटाराचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार गैरव्यवहार करणाऱ्यांवर व प्रशस्तीपत्रक देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे ही खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल प्रलंबित असल्याबाबत

**(९१) * २९६५२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या मनमानी कारभारामुळे मागील तीन महिन्यांपासून विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या पदवी, पदव्युत्तराच्या विविध अभ्यासक्रमांच्या ४०२ पैकी २५५ अभ्यासक्रमांचे निकाल प्रलंबित असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निकाल प्रलंबित असल्याने हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून ४५ दिवसात निकाल जाहिर करणे बंधनकारक असतांनाही तीन महिन्यांचा कालावधी लागण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सदर उत्तरपत्रिकेच्या मुल्यांकनासाठी सत्र-५ व ६ च्या ऐवजी सत्र १ च्या परीक्षेचे उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनासाठी प्राध्यान्य दिले तसेच संबंधित प्राध्यापकांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे व वाणिज्य विद्या शाखेसाठी असलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रमाणात कमी प्राध्यापंकाची संख्या इत्यादी कारणांमुळे विद्याशाखेचे निकाल जाहिर करण्यास विलंब झालेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रिओ येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतील क्रिडापटूंना घोषित केलेली पारितोषिकाची रक्कम अदा करण्याबाबत**

**(९२) * २७८२२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिओ येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये देशाला पदके मिळवून देणाऱ्या पी.व्ही.सिंधू व तिचे प्रशिक्षक यांचेसह कुस्तिपटू साक्षी मलिक तिचे प्रशिक्षक तसेच महाराष्ट्र कन्या ललिता बाबर व तिचे प्रशिक्षक, नेमबाज आयोनिका पॉल, नौकानयनपटू दत्तु भोकनळ, हॉकीपटू व धावपटू कविता राऊत यांना अनुक्रमे रुपये ७५ व ५० लाख तसेच प्रशिक्षकांना प्रत्येकी रुपये २५ लाख रोख स्वरुपात पारितोषिके देण्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनातर्फे आयोजित कार्यक्रमात घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ४ महिन्यांचा कालावधी होऊनही पी.व्ही.सिंधू व तिचे प्रशिक्षक यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही क्रिडापट्टूस व प्रशिक्षकास शासनाने घोषित केलेल्या पारितोषिकांची रक्कम मिळाली नसल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मा.मुख्यमंत्री महोदयांनी क्रिडापटूंना घोषित केलेली पारितोषिकाची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महाराष्ट्रातील क्रिडापटू व त्यांच्या मार्गदर्शकास शासनाच्या दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१४ च्या धोरणानुसार रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येते. इतर राज्यातील पदक प्राप्त क्रिडापटू व त्यांच्या मार्गदर्शकास गौरविण्याची बाब धोरणास समाविष्ट नाही. श्रीम.पी.व्ही.सिंधू व तिचे प्रशिक्षक श्री.गोपीचंद यांना रोख पारितोषिक देण्यात आले आहे. तथापि, मा.मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने अन्य पारितोषिकांच्या रकमा अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**काटोल (जि.नागपूर) येथील माऊंट कार्मेल कॉन्व्हेंटच्या फुड फेस्टीवल कार्यक्रमात विद्‌यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत**

**(९३) * २८९६७ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) येथील माऊंट कार्मेल कॉन्व्हेंटच्या आयोजित फुड फेस्टीवल कार्यक्रमात १५० विद्‌यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) मा. उपविभागीय दंडाधिकारी, काटोल यांच्या दिनांक २४ जानेवारी, २०१७ च्या पत्रान्वये संबंधित शाळेची चौकशी करण्यात येवून चौकशीनंतर प्राचार्य, माऊंट कार्मेल कॉन्व्हेट यांना गटशिक्षणाधिकारी काटोल यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(९४) * २६८३७ श्री.नारायण राणे, श्री.संजय दत्त, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्च प्राथमिक इयत्ता पाचवी ते आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या २४.२ टक्के विद्‌यार्थ्यांना दुसरीच्या पुस्तकातील मजकूर वाचता येत नसून राज्यातील प्राथमिक वर्गामध्ये शिकणाऱ्या मुलांना भागाकार कसा करावा हे कळत नसल्याचे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या “असर” या संस्थेच्या सन २०१६ च्या अहवालात माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) शासन निर्णय दिनांक २२ जून, २०१५ व १६ सप्टेंबर, २०१६ अन्वये राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माध्यमिक शाळेत कार्यरत शिक्षकेतर कर्मचा-यांना कालबध्द व आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

**(९५) * २७२१० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक १९८०६ ला दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक शाळेत कार्यरत असणा-या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे १२ वर्षानंतर कालबध्द व २४ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचा लाभ राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी, महाविद्यालयीन चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना दिला जात असून या योजनेचा लाभ खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षेकतर कर्मचा-यांना दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेचा लाभ मिळण्याबाबत शिक्षकेतर संघटना व शिक्षक लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत शासनाकडे मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त योजनेचा लाभ खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

माध्यमिक शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १२ वर्षाच्या सेवेनंतर शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ३० एप्रिल, १९९८ च्या शासन निर्णयान्वये कालबध्द पदोन्नती योजनेचा लाभ देण्यात येत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुरु केलेली आश्वासित प्रगती योजना अद्याप शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली नाही.

(३) होय.

(४) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.